मुबंई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक युवक आधार मराठी

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले

● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : 3 ■ अंक : १३४ ■ बुधवार, २१ जानेवारी २०२६ ■ किंमत : ४ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514




# झेडपी, पंचायत समिती निवडणुकांचे काय होणार?

## 50 टक्के आरक्षण मर्यादेचे उल्लंघन, सुप्रीम कोर्टात आज सुनावणी



**मुंबई :** महाराष्ट्रातील 20 जिल्हा परिषद आणि 200 हून अधिक पंचायत समित्यांच्या निवडणुकांमध्ये एकूण आरक्षणाच्या 50 टक्के मयदिचे उल्लंघन झाले आहे. यासंदर्भात सुप्रीम कोर्टात विविध याचिका दाखल असून त्यावर आज बुधवारी सरन्यायाधीश सूर्य कांत, न्यायमूर्ती जॉयमल्या बागची आणि न्यायमूर्ती विपुल पांचोली यांच्या खंडपीठापुढे सुनावणी होणार आहे. जि. परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांच्या तोंडावरच ही सुनावणी होत आहे.

राज्यात महापालिका निवडणुकांपाठोपाठ जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकांची धामधूम सुरू झाली आहे. या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालय आरक्षणाच्या 50 टक्के मयदिबाबत बुधवारी महत्त्वपूर्ण सुनावणी घेणार आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागास प्रवर्गाच्या आरक्षणाला 50 टक्क्यांची मर्यादा आखून देत सर्वोच्च न्यायालयाने 2021 मध्ये ऐतिहासिक निकाल दिला होता. त्या आरक्षण मयदिचे महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये उल्लंघन केले आहे. काही ठिकाणी आरक्षण 70 टक्क्यांवर नेले आहे, असा दावा करीत विकास गवळी यांनी अवमान याचिका दाखल केली आहे. यासंदर्भातील विविध याचिकांवर सरन्यायाधीश सूर्य कांत यांच्या नेतृत्वाखालील त्रिसदस्यीय खंडपीठापुढे सुनावणी होणार आहे. ज्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये 50 टक्के आरक्षण मयदिचे उल्लंघन झाले आहे, तेथील निवडणुका याचिकांवरील अंतिम निकालाच्या अधीन असतील, असे खंडपीठाने यापूर्वीच स्पष्ट केले आहे. त्याअनुषंगाने बुधवारी न्यायालय कोणते निर्देश देतेय, यावर आरक्षण मयदिचे उल्लंघन झालेल्या जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांचे भवितव्य अवलंबून असेल, अशी प्रतिक्रिया अड. देवदत्त पालोदकर यांनी दिली. आरक्षणाच्या सुनावणीकडे राजकीय वर्तुळासह संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.

## ‘हिंद-दी-चादर’ कार्यक्रमासाठी नांदेड सज्ज

**नांदेड :** नांदेड नगरी एका ऐतिहासिक सोहळ्यासाठी सज्ज होत आहे. शीख धर्माचे नववे गुरु श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांचा ३५० वा ‘शहीदी समागम’ हा भव्य कार्यक्रम २४ आणि २५ जानेवारीला पार पडणार आहे. त्यासाठी प्रशासनाने जय्यत तयारी केली आहे. देश-विदेशातून सुमारे १० लाख भाविक या सोहळ्यासाठी नांदेडमध्ये दाखल होण्याची शक्यता असल्याचे विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी सांगितले.

**सूक्ष्म नियोजन आणि विविध समित्या**

कार्यक्रमाच्या दृष्टीने प्रशासनाने सूक्ष्म नियोजन केले आहे. भाविकांच्या सोयीसाठी विविध समित्या स्थापन केल्या आहेत. यात बुटांच्या व्यवस्थेपासून ते भोजनापर्यंतच्या जबाबदाऱ्यांचे वाटप करण्यात आले आहे. भाविकांसाठी ८ ठिकाणी अखंड ‘लंगर’ (महाप्रसाद) सुरू राहतील. तसेच, त्यांच्या निवासाचीही उत्तम व्यवस्था करण्यात आली आहे. कार्यक्रम ठिकाणी आरोग्य शिबिरे उभारण्यात आली आहेत. यासोबतच शासकीय योजनांचे आणि विविध उद्योजकांचे स्टॉल्सही उपलब्ध असतील.

या सोहळ्याला अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि इतर राज्यांचे मुख्यमंत्रीही नांदेडमध्ये येतील. त्यामुळे सुरक्षिततेच्या दृष्टीनेही कडेकोट तयारी करण्यात आली आहे. महाराष्ट्र शासनाचा अल्पसंख्याक विभाग या कार्यक्रमासाठी ‘नोडल एजन्सी’ म्हणून काम पाहत आहे.


हा कार्यक्रम एका समाजापुरता मर्यादित नाही. यात लबाना, बंजारा, सिकलीगर, बंजारा, लबाना, सिंधी, मोहयाल आदींसह आणि इतर सर्व समुदायांचे लोक मोठ्याप्रमाणात सहभागी होत आहेत.

## प्रसाद हनुमंते यांची दादासाहेब फाळके चित्रपट युनियन च्या सदस्य पदी नियुक्ती


**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी :** सामाजिक क्षेत्रात कार्यरत राहून साहित्य व कला क्षेत्रातही सक्रिय सहभाग नोंदवणारे प्रसाद हनुमंते यांची दादासाहेब फाळके मुंबई विभागीय चित्रपट युनियनच्या सदस्य पदी नियुक्ती करण्यात आली आहे. संघटनेचे अध्यक्ष अजित महामुणकर यांनी प्रसाद हनुमंते यांच्या नियुक्तीची अधिकृत घोषणा केली.

या प्रसंगी दादासाहेब फाळके चित्रपट युनियनचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष संतोष आमले यांनी नियुक्तीपत्र प्रदान करून प्रसाद हनुमंते यांचे अभिनंदन केले.

चित्रपट सृष्टीमध्ये कलाकारांच्या न्याय व हक्कांसाठी गेली अनेक वर्ष कार्यरत असलेली ही प्रतिष्ठित संघटना स्व. दादासाहेब फाळके यांच्या वंशजांकडून चालवली जाते. दरवर्षी चित्रपट सृष्टीतील दिग्गज कलाकारांना ‘दादासाहेब फाळके पुरस्कार’ देऊन सन्मानित करण्याची परंपरा ही संघटना जपते. अशा महत्त्वपूर्ण आणि ऐतिहासिक संघटनेचे सदस्यत्व मिळण्याचा मान प्रसाद हनुमंते यांना मिळाल्याने पनवेल परिसरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



## पैसे मागण्याच्या वादातून इसमाला मारहाण



**दैनिक युवक आधार**
**पनवेल (वार्ताहर) :** पैसे मागण्याच्या वादावरून इसमाच्या डोक्यात लोखंडी सळीने मारहाण केल्याची घटना पनवेल शहरात घडली आहे. समीर खान (वय ३५) असे या जखमी इसमाचे नाव असून पैसे मागण्याचे वादावरून आरोपी नायाब शेख याने समीर यांच्या डोक्यात लोखंडी सळीने मारून जखमी केले. या घटनेची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## वाहनाच्या धडकेत इसम जखमी



**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर :** अज्ञात वाहकाने दिलेल्या धडकेत एक ५४ वर्षीय इसम जखमी झाल्याची घटना पनवेल परिसरात घडली आहे. फिर्यादी विष्णु जिबल (वय ५४, रा पनवेल) हे पळस्पे परिसरात असताना वाहन क्रमांक एमएच ४३ सी ई ६८३१ वरिल अज्ञात चालकाने त्याच्या वाहनाने विष्णु जिबल यांना जोरदार धडक दिली. या धडकेत विष्णु जिबल गंभीर जखमी झाले. या घटनेची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## रायगड जिल्हा परिषद व पनवेल पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक : भाजप उमेदवारांचे अर्ज दाखल करण्यास सुरुवात

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी) :** रायगड जिल्हा परिषद व पनवेल पंचायत समितीची सार्वत्रिक निवडणूक २०२६ येत्या ५ फेब्रुवारी रोजी होणार आहे. या निवडणुकांसाठी भारतीय जनता पार्टीच्या वतीने उमेदवारांनी मंगळवारी आपले उमेदवारी अर्ज निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे दाखल केले.




माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, भाजप जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, ज्येष्ठ नेते जे. एम. म्हात्रे तसेच राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्या नेतृत्वाखाली ही अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया पार पडली. यावेळी उमेदवारांसोबत आमदार प्रशांत ठाकूर, राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, पनवेल महानगरपालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, जिल्हा उपाध्यक्ष गणेश कडू, तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, पनवेल पूर्व मंडल अध्यक्ष भूपेंद्र पाटील, गरसेवक शशिकांत शेळके, नगरसेविका प्रतिभा भोईर, माजी जिल्हा परिषद सदस्य एकनाथ देशेकर, अमित जाधव, माजी पंचायत समिती सदस्या रत्नप्रभा घरत, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष आनंद ढवळे यांच्यासह कृष्णा पाटील, संतोष पाटील, शिवाजी दुर्गे, महेश पाटील, विजय मुरकुटे, डॉ. संतोष आगलावे, विचुंबे सरपंच प्रमोद भिंगारकर, विद्याधर मोकल, विद्याधर जोशी तसेच पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते व समर्थक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पनवेल तालुका व शहर भाजपच्या मध्यवर्ती कार्यालयापासून ढोल-ताशांच्या गजरात व घोषणांसह रॅली काढण्यात आली. ही रॅली पनवेल तहसीलदार कार्यालयात पोहोचून निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले. आज केळवणे जिल्हा परिषद मतदारसंघातून मंगेश वाकडीकर व वावंजे जिल्हा परिषद मतदारसंघातून कमला देशेकर यांनी, वावंजे पंचायत समिती गणासाठी आरती कुणाल काटे, चिंध्रण पंचायत समिती गणातून अंकुश खेर यांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले. उर्वरित जिल्हा परिषद व पंचायत समिती गणातील उमेदवार बुधवार, दिनांक २१ जानेवारी रोजी अर्ज दाखल करणार आहेत. नामनिर्देशन पत्र दाखल करण्याची अंतिम तारीख २१ जानेवारी असून, छाननी २२ जानेवारी रोजी होणार आहे. ५ फेब्रुवारी रोजी मतदान तर ७ फेब्रुवारी रोजी मतमोजणी होणार असून व्ही. के. हायस्कूल, पनवेल येथे मतमोजणी प्रक्रिया पार पडणार आहे.

**पनवेल मधील जिल्हा परिषदेचे गण**

वावंजे, नेरे, पाली देवद, पळस्पे, वावेघर, वडघर, गव्हाण, केळवणे

**पंचायत समितीचे गण**

वावंजे, चिंध्रण, नेरे, आदई, पालीदेवद, विचुंबे, पळस्पे, कोन, पोयंजे, वावेघर, करंजाडे, वडघर, वहाळ, गव्हाण, केळवणे, आपटा

## राज्यातील २९ महानगरपालिकांचे चित्र ३१ जानेवारीपूर्वी स्पष्ट होणार

**मुंबई :** राज्यातील २९ महानगरपालिकांच्या निवडणुकीचा फैसला लागल्यानंतर आता सर्वांना वेध लागले आहेत ते महापौरपदाचे. त्यातच आता येत्या गुरुवारी म्हणजे २२ जानेवारीला सर्व २९ महानगरपालिकांमध्ये महापौर कोण होणार? याची आरक्षण सोडत निघणार आहे. त्यानंतरच मुंबईसह सर्व महानगरपालिकांमध्ये महापौरपदी कुणाची वर्णी लागू शकते हे निश्चित होणार आहे. त्यामुळे महापौरपद कुणाला मिळणार ही उत्सुकता ३१ जानेवारीपर्यंत कायम राहणार आहे.

राज्यातील २९ मनपांमधील महापौरपदाच्या आरक्षणासंदर्भात महत्त्वाच्या हालचाली सुरू झाल्या असून, या विषयावर तोडगा काढण्यासाठी आणि आरक्षण ठरवण्यासाठी नगरविकास विभागाकडून उच्चस्तरीय बैठक बोलावण्यात आली आहे. महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाने याबाबत अधिकृत पत्रक जारी केले असून, ही बैठक २२ जानेवारीला सकाळी ११ वाजता मंत्रालयात होणार आहे. या बैठकीचे अध्यक्षस्थान राज्याचे नगरविकास मंत्री भूषवणार आहेत.

शासनाच्या या पत्रानुसार, राज्यातील २९ मनपांमध्ये महापौरपदासाठी आरक्षण निश्चित करण्याबाबत सध्या निर्माण झालेल्या पेचावर चर्चा करण्यासाठी ही बैठक आयोजित करण्यात आली आहे. मंत्रालयातील परिषद सभागृहात, सहाव्या मजल्यावर ही बैठक पार पडणार असून, त्यामध्ये संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांची उपस्थिती अपेक्षित आहे. महापौरपदाचे आरक्षण हे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सत्तास्थापनेसाठी अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. त्यामुळे या बैठकीत आरक्षण सोडत काय निघते, याकडे राज्याचे लक्ष लागले आहे.

नगरविकास विभागाच्या उपसचिव अनिरुद्ध जेवळीकर यांनी हे पत्र जारी केले असून, त्यात स्पष्ट करण्यात आले आहे की, आरक्षण निश्चितीचा निर्णय नगरविकास मंत्र्यांच्या निर्देशानुसार घेतला जाणार आहे. या बैठकीत होणाऱ्या चर्चेनंतर महापौरपदाच्या आरक्षणाबाबत अंतिम सोडत काढली जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे महापालिकेतील सत्तास्थापनेसाठी हा निर्णय निर्णायक ठरणार आहे.

या पत्राची प्रत मुख्यमंत्री कार्यालय, उपमुख्यमंत्री कार्यालय, नगरविकास विभागाचे प्रधान सचिव तसेच संबंधित वरिष्ठ सचिवांना देण्यात आली आहे. यावरून राज्य सरकार या विषयाकडे किती गांभीर्याने पाहते, हे स्पष्ट होते. महापालिका निवडणुकांचे निकाल लागल्यानंतर अनेक शहरांमध्ये महापौरपदाच्या आरक्षणावरून राजकीय चर्चा आणि मतभेद निर्माण झाले आहेत. या पार्श्वभूमीवर ही बैठक अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे.

**अशी असेल ‘महापौर’पदाची आरक्षण सोडत प्रक्रिया**

महापौरपदाचे आरक्षण चक्राकार पद्धतीने निघणार आहे.

साधारणत: मागील २० वर्षांचे आरक्षण लक्षात घेतले जाणार आहे.

जे आरक्षण याआधी त्या महापालिकेत होते, ते वगळता इतर आरक्षणाची चिठ्ठी असणार आहे.

एससी, एसटी, ओबीसी आणि खुला वर्ग, त्यामध्ये पन्नास टक्के महिला आरक्षण असे आरक्षणाचे प्रवर्ग असणार आहेत.

त्या महापालिकेमध्ये याआधी कोणते आरक्षण झालेले आहे, ती चिठ्ठी बाजूला करून उर्वरित आरक्षणाच्या चिठ्ठ्या टाकल्या जाणार आहेत.

या चिठ्ठ्या बॉक्समध्ये टाकताना सर्वांना दाखवल्या जातील, त्यानंतर पारदर्शक असणाऱ्या बॉक्समध्ये त्या टाकल्या जातील.

सर्व चिठ्ठ्या एकत्र झाल्यानंतर त्यातून एक-एक चिठ्ठी बाहेर काढून आरक्षण सोडत जाहीर केली जाणार आहे.

त्यानंतर पुन्हा ५० टक्के महिला आरक्षणाच्या चिठ्ठ्या टाकून महिला आरक्षण काढले जाणार आहे.

या पद्धतीने राज्यातील २९ महानगरपालिकांच्या महापौरपदाचे आरक्षण २२ जानेवारीला सकाळी ११ वाजता मंत्रालयातील परिषद सभागृहामध्ये निश्चित होणार आहे.

# गुरफळी येथे आमदार बाबुराव कदम यांच्या हस्ते भूमिपूजन व नागरी सत्कार सोहळा

**दैनिक युवक आधार**

**विश्वदीप कांबळे /हदगाव :** हदगाव तालुक्यातील गुरफळी (जुनी) येथे स्थानिक विकास निधी कार्यक्रमांतर्गत विविध विकासकामांचे भूमिपूजन मंगळवार, दि. 19 जानेवारी रोजी हदगाव–हिमायतनगर विधानसभेचे लोकप्रिय आमदार बाबुराव कदम कोहळीकर यांच्या हस्ते पार पडले.

यावेळी गावातील हरिनाम सप्ताहाच्या सांगता प्रसंगी आमदार कदम यांनी उपस्थित राहून ग्रामस्थांशी संवाद साधला. यानिमित्ताने सर्व ग्रामस्थांच्या वतीने आमदार बाबुराव कदम कोहळीकर यांचा नागरी सत्कार करण्यात आला.



या कार्यक्रमास विवेक देशमुख (जिल्हाप्रमुख), संदेश पाटील हाडसणीकर (युवाजिल्हाप्रमुख), संभाराव लांडगे (माजी जिल्हा परिषद सदस्य), बाबुराव कदम (माजी पंचायत समिती सभापती), बाबुराव काळे, डॉ. संजय पवार, रामदास कदम, भावी जिल्हा परिषद सदस्य रुपेश तंत्रे, बेलमंडळ येथील सरपंच तसेच गावातील सरपंच, ज्येष्ठ नागरिक, महिला व पंचक्रोशीतील कार्यकर्ते व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रम यशस्वीतेसाठी ग्रामस्थांनी परिश्रम घेतले.

# शिवसेना लातूर जिल्हाप्रमुखपदी चंद्रकांत दादा टेंगेटोल यांची निवड

**दैनिक युवक आधार**

**उदगीर प्रतिनिधी (बालाजी तेलंगे ) :** येथील चंद्रकांत टेंगेटोल यांची लातूर ग्रामीण शिवसेना जिल्हा प्रमुखपदी निवड करण्यात आली आहे.



शिंदे गट शिवसेना सचिव संजय मोरे, लातूर जिल्हा संघटक माजी आ. सुधाकर भालेराव यांच्या मार्गदर्शनाने, शिवसेना संपर्कप्रमुख ॲाड. श्रीनिवास क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि डॉ. तानाजी चंदावार, पांडुरंग बिरादार, डॉ. विश्वनाथ डांगे यांच्या सहकार्याने ही निवड करण्यात आली आहे.

घर तिथे शिवसैनिक, गाव तिथे शाखा, बुथप्रमुख यांची बांधणी करून शिवसेना वाढीसाठी संघटन मजबूत करणार असल्याचे टेंगेटोल यांनी यावेळी सांगितले.

## श्री मतोबा महाराज यात्रोत्सवाची उत्सहात सांगता

# पंधरा दिवसात दहा लाख भाविक श्री मतोबा महाराजाच्या चरणी नतमस्तक- देवस्थान ट्रस्ट

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी :** भाविकांचे श्रध्दास्थान व नैताळे ग्रामस्थांचे अराद्य दैवत श्री मतोबा महाराज यात्रोत्सवास ३ जानेवारी रोजी उत्सहात प्रारंभ झाला. यांत्रोत्सवाच्या पहील्याच दिवसी देवस्थान ट्रस्टच्या वतीने "महापुजा" व "रथ पुजा"अशा धार्मीक कार्यक्रम संपन्न झाला. त्यानंतर रथ मिरवनुकीस प्रारंभ करण्यात आला रथाची मिरनुक दुपारी ३ वाजेपर्यंत सुरु होते हा यात्रोत्सव १८ जानेवारी पर्यंत अखंड सुरु होता या १५ दिवसाच्या कालखंडात जवळपास १० लाख भाविक श्री मतोबा महाराजांच्या चरणी नतमस्तक झाल्याची माहीती देवस्थान ट्रस्टने दिली आहे.

नाशिक-छत्रपती संभाजीनगर महामार्गावर असलेल्या नैताळे येथे दरवर्षाप्रमाने याही वर्षी पौष पोर्णिमेला श्री मतोबा महाराज यांचा यात्रोत्सव भरविण्यात आला होता हा उत्सव अखंड १५ दिवस सुरु होता. यात्रोत्सवाच्या पहील्याच दिवसी पहाटे ५ वाजता भागवताचार्य ह.भ.प ज्ञानेश्वर माऊली शिंदे, सुनिल जैन,.भारती जैन तसेच



दर्शन रांगेत उभ्या असलेल्या भाग्यवान भाविक म्हणून प्रविण पाटील, अनिता पाटील यांच्या हस्ते श्री मतोबा महाराजांच्या नविन चांदीच्या मुर्तीची "महापुजा" करण्यात आली. तर सकाळी ९ वाजता बोकडदरे येथील भारत माता आश्रमाचे महंत श्री महामंडलेश्वर १०८ जनेश्वरानंदगिरीजी महाराज व रथाचे मानकरी मोहन खापरे यांच्या हस्ते रथ मिरवनुकीस प्रारंभ करण्यात आला होता. यावर्षी रथ मिरवनुकीस प्रारंभ करताना रथाला पहिली बैलजोडी जुंपण्याचा मान सिन्नर तालुक्यातील भाटवाडी येथील शेतकरी नंदकिशोर महात्मे यांना देण्यात आला होता. भाविकांचे दर्शन सहज सुलभ व्हावा म्हणून दर्शन रांगेची व मंडपाची व्यवस्था करण्यात आली होती.मंदीर परिसरात अनेक "प्रसाद"व्यावसायिकांना जागा उपलब्ध

> “यात्रोत्सवाच्या १५ दिवसाच्या कालखंडात निफाड पोलिसानी अतिशय चोख बंदोबस्त ठेऊन महामार्गावरील वाहतुक सुरळीत करण्यासाठी विशेष प्रयत्न केले.नैताळे प्राथमिक आरोग्य केंद्राची सर्व आरोग्य टीम कार्य तत्पर राहुन यात्रा कालावधीत कुठलीही रोगराई पसरऊ दिली नाही व भाविकांच्या आरोग्याची वेळोवेळी काळजी घेतली. ग्रामपंचायत सरपंच निशा पाठक ,उपसरपंच मोतीराम भवर ,ग्रामविकास अधिकारी उज्वला भोईर व सदस्य मंडळ यांच्या सुचनेनुसार व्यावसायिकाना,भाविकांना,ग्रामस्थाना वेळोवेळी रस्ते,पाणी,स्वच्छता उपलब्ध करुन देण्यात आली.यात्रोत्सवात सहभागी असणाऱ्या सर्व घटकानी देवस्थान ट्रस्ट व ग्रामपंचायत व्यावस्थापनास वेळोवेळी मदत केली त्या बद्दल सर्वांचे मनापासुन आभार..!
>
> -गायत्री बोरगुडे
> अध्यक्षा- यात्रा कमेटी,
> ग्रामपंचायत ,नैताळे

करुन देण्यात आली होती.मंदिरावर आकर्षक विद्युत रोषनाई करण्यात आली होती.

मंदिर व परिसरात गर्दीच्या नियंत्रणासाठी स्वयमसेवकाच्या नेमनुका केलेल्या होत्या.भाविकांना पिण्यासाठी शुध्द पाण्याची व्यवस्था केली होती. नारळ फोडण्यासाठी मशिनची व्यवस्था करण्यात आली होती.

यात्रा कालावधीत दररोज सकाळी ६ वाजता ,दुपारी १२ वाजता व संध्याकाळी ७ वाजता संगितबध्द आरतीचे नियोजन करण्यात आले होते.यात्रोत्सवाच्या पहिल्याच दिवसी.जिल्ह्यातील अनेक नामवंत बॅन्ड पथकानी यात्रोत्सवास हजेरी लाऊन आपआपली वाद्यकला सादर केली यात्रोत्सवात सर्व जीवनावश्यक वस्तुची दुकाने थाटलेली होती.

लासलगाव बाजार समितीच्या माजी सभापती सुवर्णाताई जगताप यांच्या हस्ते श्री मतोबा महाराजांची महाआरती करुन यात्रोत्सवाची सांगता करण्यात आली.

# छत्रपती शिवाजी विद्यालय ( पळस्पे ) पनवेल येथे भव्य विज्ञान प्रदर्शनाचे यशस्वी आयोज

## १०३९ विद्यार्थ्यांची उपस्थिती, ७५ नाविन्यपूर्ण मॉडेल्सचे सादरीकरण

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी मच्छिंद्र पाटील :** छत्रपती शिवाजी विद्यालय, ( पळस्पे )पनवेल येथे सेवा सहायोग फाउंडेशन यांच्या वतीने व WNS Cares Foundation यांच्या सहकार्याने भव्य विज्ञान प्रदर्शनाचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या विज्ञान प्रदर्शनामध्ये एकूण ४५ शाळांतील १०३९ विद्यार्थी, शिक्षक व स्वयंसेवकांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला.

या प्रदर्शनाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, सर्जनशीलता, नवोन्मेष व संशोधनात्मक विचारसरणी विकसित करणे, तसेच विज्ञान हे केवळ प्रयोगशाळांपुरते मर्यादित नसून ते दैनंदिन जीवनाशी कसे निगडित आहे हे प्रत्यक्ष अनुभवातून समजावून देणे हा होता.



या प्रदर्शनाला भेट देण्यासाठी ६८० विद्यार्थी उपस्थित होते, तर २१५ विद्यार्थ्यांनी थेट प्रदर्शनात सहभाग घेतला. एकूण ७५ वैज्ञानिक मॉडेल्स सादर करण्यात आली. यामध्ये १०४ शिक्षक व ४० स्वयंसेवकांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

कार्यक्रमाची सुरुवात पारंपरिक दीपप्रज्वलन व सरस्वती पूजनाने करण्यात आली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या मधुर स्वागतगीताने उपस्थितांची मने जिंकली.

या विज्ञान प्रदर्शनाला शिक्षण क्षेत्रातील मान्यवर, शास्त्रज्ञ, शिक्षणाधिकारी व तज्ज्ञ परीक्षकांची उपस्थिती लाभली.

यामध्ये श्री. संदीप वर्गे (जिल्हा समन्वयक, शिक्षण विभाग),श्री. रमेश चव्हाण (शिक्षणाधिकारी, पनवेल महानगरपालिका),डॉ. रविकांत आलटेकर (शास्त्रज्ञ, भाभा अणुसंशोधन केंद्र),श्री. रविंद्र आर्डक (निवृत्त प्राध्यापक, VJTI),तसेच सेवा सहायोग फाउंडेशन व WNS Cares Foundation चे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

परीक्षकांनी विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधून त्यांच्या प्रकल्पांचे मूल्यमापन केले व मौल्यवान मार्गदर्शन दिले. विद्यार्थ्यांनी सौर ऊर्जा, आपत्ती व्यवस्थापन, कचरा व्यवस्थापन, जलसंधारण, रोबोटिक्स, शाश्वत शेती यांसारख्या विषयांवरील नाविन्यपूर्ण संकल्पना प्रभावीपणे मांडल्या.प्रदर्शनाच्या समारोपप्रसंगी प्रमाणपत्र वितरण व पारितोषिक समारंभ पार पडला. विविध गटांमध्ये उत्कृष्ट प्रकल्प सादर करणाऱ्या शाळांना पारितोषिके देऊन गौरविण्यात आले.या विज्ञान प्रदर्शनामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढला, वैज्ञानिक विचारसरणी विकसित झाली आणि अनुभवाधारित शिक्षणाला चालना मिळाली. अशा प्रकारचे उपक्रम भविष्यातील संशोधक व शास्त्रज्ञ घडविण्यास निश्चितच उपयुक्त ठरणार असल्याचे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.

# अंमली पदार्थ बाळगणाऱ्या इसमास पनवेल शहर पोलिसांनी केली अटक

**दैनिक युवक आधार**

**पनवेल वार्ताहर :** पनवेल परिसरात २ लाख ८३ हजार रुपये किमतीचा अंमली पदार्थ बाळगणाऱ्या इसमास पनवेल शहर पोलिसांनी अटक केली.

पनवेल शहरातील तक्का परिसरात अंमली पदार्थ विक्रीसाठी आरोपी येणार असल्याची माहिती पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांना मिळाली होती. त्यानुसार पोलीस निरीक्षक (गुन्हे) शाकीर पटेल, सहा. पोलीस निरीक्षक प्रविण फडतरे, पोलीस उपनिरीक्षक विनोद लभडे आणि हजरतअली पठाण आदींच्या पथकाने सापळा रचून आरोपी अनुरागकुमार यादव (वय 33, रा बिहार) याला अटक केली. त्याच्या कडून पोलिसांनी अंमली पदार्थ तसेच इतर माल असा एकूण २ लाख ९४ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

# बनावट मद्य विक्री करणाऱ्या दोघे जण ताब्यात

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर) :** राज्य उत्पादन शुल्क पनवेल शहर विभाग यांनी बनावट मद्य विक्री करणाऱ्या दोघांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून एकूण ७८ हजार रुपयांचा मद्य जप्त करण्यात आला.राज्य उत्पादन शुल्क विभागाला खांदेश्वर रेल्वे स्टेशन परिसरात दोन इसम बनावट विदेशी मद्यची विक्री करण्यासाठी येणार असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार त्या ठिकाणी सापळा रचण्यात आला. यावेळी खांदेश्वर रेल्वे स्टेशन परिसरात दोन संशयित इसम प्रवासी बॅगा खांद्यावर घेऊन जात असताना त्यांची तपासणी केली या बॅगमध्ये बनावट विदेशी मद्य सापडून आले. ते मद्य वसई वरून आणले असल्याचे त्यांनी सांगितले. यानुसार वसई येथील आरोपीच्या घरी छापा टाकला असता बनावट मद्यने बॉटलिंग केलेल्या बाटल्या, गोवा राज्य निर्मित आणि विक्रीसाठी आणलेल्या विदेशी मद्याच्या रिकाम्या प्लास्टिक बाटल्या, दादरा नगर हवेली निर्मित आणि विक्रीसाठी असणाऱ्या विदेशी मद्याच्या रिकाम्या काचेच्या बाटल्या आणि इतर बाटल्या जप्त करण्यात आल्या. असा एकूण ७८ हजार १८८ किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

# मुलाने केली वडिलांची १७ लाख ४० हजारी फसवणूक

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर) :** वडिलांच्या नावावर असलेल्या चार फ्लॅटचे बनावट भाडेकरारनामा बनवुन त्यावर वडिलांचे खोटया सहया करून परस्पर भाडयाने देत भाडयापोटी मिळणारी १७ लाख ४० हजार रुपयाची स्वतःकडे ठेवत वडिलांची आर्थिक फसवणूक केल्याची घटना पनवेल शहरात घडली आहे.सेवानिवृत्त प्रकाश पाटील (वय-७१, रा नवीन पनवेल) यांच्या करंजाडे परिसरात मालकीच्या असलेल्या चार फ्लॅटचे बनावट भाडेकरारनामा आरोपी प्रशांत पाटील (वय ४९, रा नवीन पनवेल) याने बनवुन त्यावर वडिलांचे खोटया सहया करून परस्पर भाडयाने देत भाडयापोटी मिळणारी १७ लाख ४० हजार रुपयाची स्वतःकडे ठेवत वडिलांची आर्थिक फसवणूक केली. यासंदर्भात पनवेल शहर पोलीस ठाण्यात मुलाविरोधात फसवणुकीचा गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

# महाराष्ट्र ग्रामीण बँक माहूर शाखा मार्फत लांजी येथील कुटुंबाला २ लाखांचा विमा

**दैनिक युवक आधार**

**(प्रतिनिधी): सय्यद इसा :** तालुक्यातील लांजी येथील रहिवासी दिवंगत लक्ष्मण भिकू पवार यांच्या अपघाती निधनानंतर, त्यांच्या कुटुंबाला 'प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजने'चा (PMS-BY) लाभ मिळाला आहे. बँकेच्या मदतीने आवश्यक ते कागदपत्र पुर्ण केल्यावर वारसदार श्रीमती उषा लक्ष्मण पवार यांना 2 लाख रुपयांचा विमा बँकेचे व्यवस्थापाक अमोल अलकारी यांचे हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी बँकेचे अधिकारी विपीन सर,बँकेचे बीसी राहूल जाधव हे उपस्थित होते. लक्ष्मण भिकु पवार यांनी महाराष्ट्र ग्रामीण बँक, शाखा माहूर येथून प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजनेचे संरक्षण घेतले होते. २२ मार्च २०२५ मध्ये त्यांचे दुर्दैवी निधन झाले. यानंतर विमा दाव्याची तांत्रिक




प्रक्रिया पूर्ण करण्यात आली व २ लाख रुपयांची विमारक्कम विनाविलंब मंजूर होऊन वारसदाराच्या बँक खात्यात जमा झाली आहे. कुटुंबातील कर्ता पुरुष गमावलेल्या पवार कुटुंबाला प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजनेमुळेच आर्थिक पाठबळ मिळाले आहे.

**सामान्यांसाठी बँकेची तत्परता:**

महाराष्ट्र ग्रामीण बँक, माहूर ही शाखा केवळ बँकिंग व्यवहारच नाही, तर शासनाच्या विमा योजनांची अंमलबजावणी प्रभावीपणे करत असल्याचे यावरून दिसुन आले.अवघ्या अल्प दरात मिळणारा हा विमा सामान्यांसाठी किती फायदेशीर ठरू शकतो, हे या घटनेवरून पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. "विमा काढल्यामुळे आज संकटाच्या काळात कुटुंबाला ही आर्थिक मदत मिळाली," अशी भावना ग्रामस्थांकडून व्यक्त होत आहे.

# महाराष्ट्र भारताच्या भविष्याचे पॉवर हाऊस – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

- पहिल्याच दिवशी १४ लाख ५० हजार कोटी गुंतवणूकींचे १९ सामंजस्य करार
- पंधरा लाख रोजगार संधी, आयटी, डाटा सेंटर, हरित ऊर्जा क्षेत्रात गुंतवणूक
- गतवर्षीच्या टप्पा ओलांडून, यंदा विक्रमी गुंतवणूकीचा विश्वास




**दाओस :** भारतातील उद्योग आणि गुंतवणूक क्षेत्रासाठी महाराष्ट्रच गेटवे-ऑफ-इंडिया' असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विधान खरे ठरवणारे तब्बल १४ लाख ५० हजार कोटींचे गुंतवणूक करार पहिल्याच दिवशी करण्यात आले. या गुंतवणूकीसोबतच राज्यात १५ लाख रोजगार संधी निर्माण होणार आहेत.

महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, गुंतवणूक आणि सेवा विभागाच्या माध्यमातून यंदा विविध विभागांनी आणि विविध क्षेत्रातील उद्योगांच्या प्रतिनिधी समवेत मुख्यमंत्री श्री. फडणवीस, उद्योग मंत्री डॉ. उदय सामंत यांच्या प्रमुख उपस्थितीत या सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या केल्या आहेत.

हरित ऊर्जा, अन्न प्रक्रीया, पोलाद निर्मिती, आयटी-आयटीईस, डाटा सेंटर्सह ईव्ही- ऑटोमोबाईल, जहाज बांधणी, डीजिटल इन्फ्रा अशा विविध क्षेत्रातील ही गुंतवणूक मुंबईसह राज्याच्या रत्नागिरी, पालघर, गडचिरोली, अहिल्यानगर या भागात पोहचणार असल्याने, तेथे उद्योग वाढीसह मोठ्या प्रमाणा रोजगार निर्मितीला चालना मिळणार आहे.

वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच्या वार्षिक बैठकीकरिता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उद्योग मंत्री डॉ. उदय सामंत यांच्यासह महाराष्ट्र शासनाच्या विविध विभागाचे प्रतिनिधीमंडळ दावोस येथे उपस्थित आहे. दावोस मधील पहिल्याच दिवसापासून जगभरातील विविध क्षेत्रातील उद्योगांनी महाराष्ट्रात गुंतवणुकीसाठी स्वारस्य दर्शवणे सुरु केले. यातून गुंतवणुकीचा मोठा ओघ सुरु झाल्याने महाराष्ट्र पॅव्हेलियनमध्ये उत्साहाचे चित्र निर्माण झाले.

तत्पुर्वी, दावोस मधील महाराष्ट्र पॅव्हेलियनचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते, उद्योग मंत्री डॉ. उदय सामंत यांच्या उपस्थितीत उद्घाटन झाले.’ भविष्याचे वेध घेण्यासाठी सज्ज, विश्वासार्ह आणि दीर्घकाळचा भागीदार म्हणून महाराष्ट्र स्वागत करीत आहे. भारताच्या भविष्याचे पॉवर हाऊस म्हणून महाराष्ट्र जगाला, उद्योग विश्वाला साद घालत आहे, अशी मनोदय भावनाही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केली.

सामंजस्य करारांवरील स्वाक्षरी व करारांच्या आदान-प्रदान प्रसंगी झालेल्या चर्चेत मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, ‘महाराष्ट्रावरील उद्योग क्षेत्राचा, गुंतवणूकदारांचा हा विश्वास सार्थ ठरविण्यासाठी आम्ही सदैव सज्ज आहोत.

## राज्यात कुपोषित बालकांचे मृत्यू रोखण्यात शासन अपयशी

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / रमेश औताडे :** महाराष्ट्रात कुपोषणामुळे बालक, गर्भवती महिला आणि स्तनदा मातांचे मृत्यू अद्याप थांबले नसल्याने राज्यातील परिस्थिती गंभीर असल्याचे निरीक्षण उच्च न्यायालयाने नोंदवले आहे. कुपोषण रोखण्यासाठी राबवण्यात येणाऱ्या योजनांमध्ये सातत्य आणि प्रभावी अंमलबजावणीचा अभाव दिसून येत असल्याबद्दल न्यायालयाने राज्य सरकारवर ताशेरे ओढले.



राज्यातील आदिवासी, दुर्गम आणि ग्रामीण भागांमध्ये आरोग्य व पोषण सुविधा पुरेशा प्रमाणात पोहोचत नसल्याचे वास्तव समोर आले आहे. केवळ कागदोपत्री योजना जाहीर करून प्रश्न सुटणार नसून, प्रत्यक्ष जमिनीवर परिणाम दिसला पाहिजे, असे स्पष्ट मत न्यायालयाने व्यक्त केले. न्यायालयात सादर करण्यात आलेल्या माहितीनुसार, गेल्या वर्षी एप्रिल ते डिसेंबर या कालावधीत राज्यात सुमारे १९५ बालकांचा मृत्यू कुपोषणाशी संबंधित कारणांमुळे झाला आहे. मात्र अनेक जिल्ह्यांमध्ये माता व बाल आरोग्याची अचूक आकडेवारी उपलब्ध नसल्याने नियोजनावर परिणाम होत असल्याची बाबही समोर आली.

राज्य स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करत असताना, अजूनही मोठ्या लोकसंख्येला मूलभूत पोषण, स्वच्छ पाणी आणि प्राथमिक आरोग्य सुविधांसाठी संघर्ष करावा लागत असल्याची खंत न्यायालयाने व्यक्त केली. आदिवासी व दुर्गम भागांमध्ये आरोग्य यंत्रणा मजबूत करणे, पोषण आहार योजना प्रभावीपणे राबवणे आणि त्याचा लाभ थेट लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवणे ही शासनाची जबाबदारी असल्याचेही न्यायालयाने स्पष्ट केले.कुपोषणामुळे होणारे मृत्यू ही प्रशासनाच्या अपयशाची बाब असून, या प्रश्नावर राज्य सरकारने तातडीने ठोस आणि कालबद्ध उपाययोजना राबवाव्यात, असा स्पष्ट इशाराही उच्च न्यायालयाने दिला आहे.


## CISF व BSF मध्ये निवड झालेल्या जवानांचा भव्य सत्कार समारंभ

**दैनिक युवक आधार**

**नांदेड प्रतिनिधी/प्रकाश गवारे :** केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दल (CISF) मध्ये शौरभ डिगांबरराव बोदमवाड तसेच सीमा सुरक्षा दल (BSF) मध्ये गोपाल परमेश्वर आक्कमवाड यांची निवड झाल्याने मेंडका गावाचा नावलौकिक राज्य व देशपातळीवर उंचावला आहे. या ऐतिहासिक यशाबद्दल मेंडका गावात भव्य स्वागत व सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते.

हा गौरवपूर्ण कार्यक्रम यादव मित्र मंडळ, मेंडका येथील तरुण बांधवांच्या पुढाकारातून आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मेंडका नगरीचे सरपंच लक्ष्मणराव ईजळकर हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रभावी व प्रेरणादायी सूत्रसंचालन परशुराम आक्कमवाड सर यांनी केले.

यावेळी मार्गदर्शन करताना परशुराम आक्कमवाड सर म्हणाले,




"विद्यार्थी जीवनात ग्रंथ, कादंबऱ्या व महापुरुषांचे जिवन चरीत्र आणि प्रेरणादायी साहित्याचे नियमित वाचन केले पाहिजे. वाचनामुळे विचारप्रक्रिया प्रगल्भ होते व यशाचा मार्ग अधिक सुलभ होतो."

कार्यक्रमात एस.आर.पी.एफ. संभाजीनगर येथील पोलीस ज्ञानेश्वर जंगीलवाड, नांदेड पोलीस शंकर बक्केवाड, तसेच शंकर पामलवाड सर यांनी आपले मनोगत व्यक्त करत निवड झालेल्या जवानांचे अभिनंदन केले व त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी दिगांबर दासरे सर यांनीही प्रेरणादायी विचार मांडून युवकांना देशसेवेचे महत्व पटवून दिले.

कार्यक्रमाच्या शेवटी माजी सरपंच शिवचरण पारडकर यांनी उपस्थितांचे आभार मानले.

या प्रसंगी मेंडका गावातील सर्व समाज बांधव मित्रपरिवार, नातेवाईक, मान्यवर व ग्रामस्थ बालाजी नागलवाड, महाजन बक्केवाड, शेख शेबीर, व्यंकटी आक्कमवाड, बळीराम अक्कमवाड, नवनाथ जंगिलवाड, गंगाधर दासरे, तुकाराम मनुरे, अंबादास अक्कमवाड, दत्ता अनमवाड, उत्तम जनजवळे, तुळशीराम चुकेवाड, रमेश सुदेवाड, गणपत लाडमाड, मारुती आक्कमवाड, देविदास आकमवाड, गोपाल बक्केवाड, आकाश घोसले, हनुमान जंगीलवाड, सतीश अक्कमवाड, गुणाजी अकामवाड, रमेश पाटील वसुरे, गोविंदराव अनमवाड, अंकुश जंगीलवाड, चंद्रकांत आकमवाड, सूर्यकांत जगीलवाड, दिगंबर अक्कमवाड, मोठ्या संख्येने उपस्थित होते.

CISF व BSF सारख्या देशाच्या सुरक्षेसाठी अत्यंत महत्त्वाच्या दलांमध्ये मेंडका गावातील युवकांची निवड होणे ही संपूर्ण गावासाठी अभिमानाची बाब असून तरुण पिढीसाठी हा प्रेरणादायी आदर्श ठरत आहे.

विशेष म्हणजे, मेंडका नगरीतील एक हजारांहून अधिक शासकीय कर्मचारी विविध विभागांत कार्यरत असून हे गाव शैक्षणिक, सामाजिक व प्रशासकीय क्षेत्रातही आपली वेगळी ओळख निर्माण करत आहे.

## श्रीवर्धन तालुक्यात बॉक्साइट मायनिंगविरोधात ग्रामस्थांचा आक्रोश; पर्यावरणीय हानीबाबत चौकशीची मागणी

**दैनिक युवक आधार**

**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी/अनिकेत मोहित :** श्रीवर्धन तालुक्यातील गडबवाडी गाव परिसरात सुरू असलेल्या बॉक्साइट उत्खनन प्रकल्पाविरोधात स्थानिक ग्रामस्थांनी तीव्र विरोध दर्शवला आहे. निसर्गाची मोठ्या प्रमाणावर हानी होत असून संबंधित उत्खननास दिलेल्या परवानग्यांची सखोल शहानिशा करण्यात यावी, अशी ठाम मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

सध्या सुरू असलेल्या उत्खननामुळे आसपासच्या गावांमध्ये पाणीटंचाईची समस्या गंभीर होत चालली आहे. भूगर्भातील पाण्याच्या पातळीत घट होत असून विहिरी व बोअरवेल आटण्याच्या मार्गावर आहेत. यासोबतच, उत्खननातून उडणाऱ्या प्रचंड धुळीमुळे लहान मुले,



ज्येष्ठ नागरिक आणि महिलांमध्ये श्वसनाचे आजार वाढत असल्याच्या तक्रारीही समोर येत आहेत.

विशेष चिंतेची बाब म्हणजे, चालू असलेले बॉक्साइट उत्खनन क्षेत्र थेट वनखात्याच्या जमिनीला लागून आहे. त्यामुळे वन्य प्राण्यांच्या नैसर्गिक अधिवासावर गंभीर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. यामुळे वनखात्याने तातडीने आपली जमीन पुन्हा मोजून अधिकृत हद्द निश्चित करावी, जेणेकरून वनक्षेत्रावर अतिक्रमण होणार नाही आणि वन्यजीवांना त्रास होणार नाही, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे की, पर्यावरणीय परिणामांचा सविस्तर अहवाल, पाणी स्रोतांवर होणारा परिणाम, तसेच प्रदूषण नियंत्रणाचे नियम काटेकोरपणे पाळले जात आहेत की नाही, याची प्रशासनाने तातडीने चौकशी करावी. अन्यथा, भविष्यात या उत्खननामुळे संपूर्ण परिसराला मोठ्या पर्यावरणीय व आरोग्यविषयक संकटाला सामोरे जावे लागेल, असा इशाराही ग्रामस्थांनी दिला आहे.

ग्रामस्थांच्या या आंदोलनामुळे आता प्रशासन व संबंधित विभाग कोणती भूमिका घेतात, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

## रस्ता सुरक्षा चित्ररथ व हेल्मेट बाईक रॅलीचे परिवहन आयुक्तांच्या हस्ते उद्घाटन

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी राकेश यादव वाडी नागपूर :** रस्ता सुरक्षा अभियान २०२६ अंतर्गत नागपूर शहरात रस्ता सुरक्षेविषयी जनजागृती करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या रस्ता सुरक्षा चित्ररथाचे उद्घाटन आज महाराष्ट्र राज्याचे परिवहन आयुक्त विवेक भीमनवार यांच्या हस्ते करण्यात आले.

रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालय, भारत सरकार यांच्याद्वारे जानेवारी २०२६ हा रस्ता सुरक्षा महिना घोषित करण्यात आला असून या महिन्यात संपूर्ण देशभरात रस्ता सुरक्षा अभियान राबविण्यात येत आहे. या अंतर्गत नागपूर शहरातील रस्ते अपघात व अपघाती मृत्यूंचे प्रमाण कमी करण्यासाठी प्रादेशिक परिवहन कार्यालय नागपूर शहर यांच्याद्वारे



विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे.

आज प्रादेशिक परिवहन अधिकारी नागपूर शहर किरण बिडकर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रादेशिक परिवहन कार्यालय, सिव्हिल लाईन्स येथे रस्ता सुरक्षा चित्र रथ तसेच हेल्मेट बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.राज्याचे परिवहन आयुक्त विवेक भीमनवार यांच्या हस्ते या कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. या प्रसंगी विजय चव्हाण, प्रादेशिक परिवहन अधिकारी, नागपूर (ग्रामीण), रविंद्र भुयार, प्रादेशिक परिवहन अधिकारी, अकोला, अविनाश राऊत, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, नागपूर (पूर्व), संतोष काटकर, सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी, नागपूर (शहर), राहूल भगत, सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी, नागपूर (पूर्व) तसेच नागपूर शहरातील तीनही परिवहन कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

श्री. भीमनवार यांनी उपस्थितांना रस्ता सुरक्षेबाबत मार्गदर्शन केले तसेच विविध उपाययोजना करून रस्ते अपघाताचे प्रमाण मागील वर्षीच्या तुलनेत किमान १५ टक्के कमी करण्याचे आवाहन केले.

## उंबरठाण महाविद्यालयाच्या एन.एस.एस. शिबिराचे राशा येथे उद्घाटन

**दैनिक युवक आधार**

**राजेंद्र टोपले, सुरगाणा :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना आणि डांग सेवा मंडळाचे कला व वाणिज्य महाविद्यालय, उंबरठाण यांच्या संयुक्त विद्यमाने दत्तक गाव राशा (ता. सुरगाणा) येथे विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिराचे उद्घाटन उत्साहात संपन्न झाले.

या शिबिराचे उद्घाटन राशा गावचे सरपंच श्री. सिताराम भोये यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य




डॉ. एकनाथ आहेर होते.

'शाश्वत विकासासाठी युवक : पाणलोट आणि पडीक जमीन व्यवस्थापन' या मुख्य संकल्पनेवर आधारित हे शिबिर १६ ते २२ जानेवारी २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आले आहे. सात दिवसांच्या या निवासी शिबिरात एकूण ५० स्वयंसेवक सहभागी असून, या कालावधीत जलसंधारण, स्वच्छता मोहीम तसेच पडीक जमीन व्यवस्थापनासंदर्भातील विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत.कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रीय सेवा योजनेच्या परंपरेनुसार झाली. एन.एस.एस. कार्यक्रम अधिकारी प्रा. हेमलता महाले यांनी प्रास्ताविकातून शिबिराची रूपरेषा मांडली. सूत्रसंचालन प्रा. सुभाष पवार यांनी केले व उपस्थितांचे आभार मानले.या उद्घाटन प्रसंगी राशाचे पोलीस पाटील श्री. हसमुख वाडेकर, ग्राम. पं. सदस्य श्री. चिंतामण गावित, जि.प. शिक्षक श्री. रवींद्र पवार, सेवानिवृत्त शिक्षक श्री. शिवराम पवार, श्री. आर. यू. अहिरराव, श्री. गणेश कुलकर्णी तसेच ग्रामस्थ उपस्थित होते. शिबिराच्या यशस्वीतेसाठी प्रा. राजाराम कणसे, प्रा. तुळशीराम चौधरी, प्रा. मंदीप राऊत, प्रा. किशोर काळे, प्रा. कलावती थविल, प्रा. मधुकर गावित, प्रा. राजेश पेटार, प्रा. सारिका पागी, श्री. अनिल कदम, श्री. अनिल ठाकरे, श्री. हिरामण गावित व स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले.

## गट विकास अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली तालुका समन्वय समितीची सभा

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** स्पर्श कुष्ठरोग जनजागृती अभियान हे 30 जानेवारी ते 13 फेब्रुवारी 2026 या दरम्यान राबविण्याकरिता गट विकास अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली तालुका समन्वय समितीची सभा 19 जानेवारी रोजी घेण्यात आली. या सभेमध्ये असे ठरले की 26 जानेवारी रोजी कुष्ठरोगा विषयी जनजागृती करायची आहे, प्रत्येक शाळेमध्ये कुष्ठरोगा बाबत माहिती देऊन प्रतिज्ञाचे वाचन करायचे आहे.

तसेच प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये ग्रामसभेच्या वेळी कुष्ठरोगाबाबत माहिती देऊन प्रतिज्ञाचे वाचन करायचे आहे. 30 जानेवारी ते 13 फेब्रुवारी 2026



या दरम्यान तालुक्यामध्ये शाळेमध्ये निबंध स्पर्धा, नाट्यकला सादर करणे, शाळेतील मुलांची गावात प्रभात फेरी काढून जनजागृती करणे,बकुष्ठरोगा बाबत समाजात असलेले गैरसमज दूर करायचे आहेत. हे अभियान तालुका आरोग्य अधिकारी डॉ.अपर्णा खेडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येणार आहे.

## ग्रामपंचायत कार्यालय, गुगुळ पिंपरी येथे आमरण उपोषणाचा इशारा




**दैनिक युवक आधार**

**हिंगोली प्रतिनिधी/प्रशांत टाकसाळ :** जल जीवन मिशन अंतर्गत करण्यात आलेल्या अपूर्ण व निष्काळजी सिंचन विहिरीच्या कामामुळे शेतातील पाईपलाईन फोडण्यात आली असून, यामध्ये अंदाजे रु. ४ लाखांचे आर्थिक नुकसान झाले आहे.

या नुकसानीची भरपाई देऊन पाईपलाईन तात्काळ पूर्ववत सुरू करण्यात यावी तसेच संबंधित गुत्तेदारावर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, या मागणीसाठी शिवरामआप्पा बळीरामआप्पा धोत्रे (रा. गुगुळ पिंपरी) हे आपल्या कुटुंबासह दि. २० जानेवारी २०२६ पासून ग्रामपंचायत कार्यालयासमोर बेमुदत आमरण उपोषणास बसणार आहेत.

जोपर्यंत न्याय मिळत नाही व मागण्या मान्य होत नाहीत, तोपर्यंत उपोषण सुरू ठेवण्याचा निर्धार उपोषणकर्त्यांनी व्यक्त केला आहे. प्रशासनाने या गंभीर प्रकरणाची तात्काळ दखल घेऊन योग्य ती कार्यवाही करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

**उपोषणकर्ते :**

शिवरामआप्पा बळीरामआप्पा धोत्रे व सह कुटुंब परिवार

## शिवसेना ( शिंदे गट ) मा. आमदार सुधाकर भालेराव साहेब पक्षासाठी निष्ठावंत !

### उदगीर मध्ये भा.ज . पा . व राष्टीवादी, कार्याकत्याची राजकीय कोंडी कायम......... ?

**दैनिक युवक आधार**


**उदगीर प्रतिनिधी( बालाजीतेलंगे ) :** उदगीर जिल्हा परिषद निवडणुकीचा रणसंग्राम तोंडावर येऊन ठेपला असताना, राष्ट्रवादी काँग्रेस आणि भारतीय जनता पार्टी यांच्यातील युतीचा निर्णय मात्र अद्यापही अधांतरीच आहे. मात्र उमेदवारी अर्ज भरण्यास अवघे दिवस शिल्लक असताना नेत्यांची अनाकलनीय शांतता आणि परस्परविरोधी हालचालींमुळे इच्छूक उमेदवार अक्षरशः राजकीय कात्रीत सापडले आहेत.

महायुतीतील घटक पक्ष शिवसेनेने 'एकला चलो'चा झेंडा फडकावल्याने महायुतीचे गणित बिघडले असून, उदगीरमध्ये आता थेट भाजपा-राष्ट्रवादी युती होणार की स्वतंत्र लढत ? हा प्रश्न ऐरणीवर आला आहे. युतीची अधिकृत घोषणा नसल्याने दोन्ही पक्षांतील इच्छूक उमेदवार दोन्ही हातात नारळ ठेवून बसल्याचे चित्र आहे.भाजपामध्ये युतीसाठी आग्रही असलेला एक गट सक्रिय असताना, दुसरा गट स्वबळावरच मैदान गाठूया या भूमिकेवर ठाम आहे.

मात्र जिल्हास्तरीय व स्थानिक नेते ठोस भूमिका मांडण्याऐवजी मौन पाळत असल्याने कार्यकर्त्यांचा संताप वाढत चालला आहे. वेळ आमची जात आहे, निर्णय तुमचा कुठे आहे.....? असा सवाल आता उघडपणे विचारला जात आहे.

दुसरीकडे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातही संभ्रमाचे सावट आहे. माजी मंत्र्यांनी युतीसाठी हात पुढे केला असला तरी, अंतिम निर्णयावर शिक्कामोर्तब न झाल्याने युतीचा पेच कायम आहे. परिणामी, दोन्ही पक्षांतील इच्छूक उमेदवार अर्ज






भरण्याच्या उंबरठ्यावर उभे राहूनही ठोस दिशा मिळत नसल्याने अस्वस्थ झाले आहेत.

दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट), काँग्रेस, वंचित बहुजन आघाडी आणि शिवसेना (उबाठा) यांची महाविकास आघाडी होणार याबाबत मात्र कोणतीही शंका नसल्याचे राजकीय निरीक्षकांचे मत आहे. त्यामुळे एका बाजूला आघाडीचे चित्र स्पष्ट होत असताना, दुसऱ्या बाजूला युतीतील गोंधळाने राजकीय गणिते विस्कटली आहेत. एकूणच, युती-अयुतीच्या अनिर्णयामुळे उदगीर जिल्हा परिषद निवडणूक आधीच तापली असून, नेत्यांच्या विलंबामुळे इच्छूक उमेदवारांची धावपळ, नाराजी आणि अस्वस्थता शिगेला पोहोचली आहे. निर्णय उशिरा झाला तर त्याचे राजकीय परिणाम गंभीर ठरू शकतात, हे मात्र निश्चित आहे .युती की आघाडी ? इच्छूक उमेदवार संभ्रमात असुनभाजप, राष्ट्रीवादी , युती हालाचाली ....... ? आमदार सुधाकर भालेराव साहेब यांच्या मुळे शिवसेना ( शिंदे गट ) स्वतंत्र झाली आहे. यामुळे शिवसेने मध्ये कार्यकर्त्यांचे बळ आधीक वाढले आहे .

## श्री.मुंगसाजी महाराजांच्या नगरीत भक्तीचा महाभंडारा!

# पिंपळ्यात भागवत कथा–हरिनाम सप्ताहात २५ जानेवारीला ज्ञानेश्वर महाराज चौधरी पाटील यांचे ज्वलंत सुपर कीर्तन

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे/वाशीम जिल्हा प्रतिनिधी :** श्री.मुंगसाजी महाराज संस्थान, पिंपळा येथे आयोजित श्रीमद् भागवत कथा व अखंड हरिनाम सप्ताह हा भक्ती, श्रद्धा आणि आध्यात्मिक चेतनेचा भव्य सोहळा ठरत आहे. संतपरंपरेने उजळलेल्या श्री.मुंगसाजी महाराजांच्या पावन भूमीत हरिनामाचा गजर, टाळ-मृदंगाचा निनाद आणि विठुनामाच्या जयघोषाने संपूर्ण गाव भक्तीरसात न्हालं आहे.

या सप्ताहातील सर्वात मोठा आकर्षण ठरणार आहे दि. २५ जानेवारी २०२६ रोजी होणारे ह.भ.प. युवा कीर्तनकार ज्ञानेश्वर महाराज चौधरी पाटील यांचे सुपर कीर्तन. कमी वयातच त्यांनी वारकरी संप्रदायाचा सखोल अभ्यास करून संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर, संत नामदेव यांच्या विचारधारेचा प्रभावी प्रचार-प्रसार केला आहे. त्यांच्या कीर्तनातून केवळ भक्तीच नव्हे तर समाजप्रबोधन, नैतिक मूल्ये आणि संस्कारांची शिकवण मिळते.

युवा पिढीला योग्य दिशा देण्याचे कार्य ज्ञानेश्वर महाराज आपल्या कीर्तनातून सातत्याने करत आहेत. मोबाईल, व्यसन, दिशाहीनता यामध्ये अडकलेल्या तरुणांना ते संतवाणीच्या माध्यमातून आत्मभान, कर्तव्यबोध आणि राष्ट्रभक्तीचे संस्कार देत आहेत. त्यामुळे तरुण वर्गात त्यांच्याबद्दल विशेष आकर्षण असून, त्यांच्या कीर्तनाला



मोठी गर्दी होत असते.

श्री मुंगसाजी महाराजांच्या चरणस्पर्शाने पवित्र झालेल्या या गावात आज प्रत्येक घरातून हरिनामाचा निनाद होत असून पिंपळा गाव पूर्णतः भक्तीमय वातावरणात न्हालं आहे. सप्ताहादरम्यान श्रीमद् भागवत कथेचे पारायण, अखंड हरिनाम, भजन, कीर्तन, प्रवचन, आरती असे विविध धार्मिक कार्यक्रम सुरू आहेत.

दि. २५ जानेवारी रोजी होणाऱ्या ज्ञानेश्वर महाराजांच्या कीर्तनासाठी पिंपळा परिसरातील तसेच जवळपासच्या खेड्यांतील नागरिक, भाविक, युवक-युवती मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असल्याचे चित्र आहे. आधीपासूनच गावात उत्साहाचे वातावरण असून भक्त मंडळी या दिवशीची आतुरतेने वाट पाहत आहेत.श्री.मुंगसाजी महाराज संस्थान व पिंपळा ग्रामस्थांच्या वतीने सर्व भाविकांनी या भक्तीमहोत्सवाचा लाभ घ्यावा व हरिनामाच्या गजरात सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# प्रभात मित्र मंडळाचा २९ वा वर्धापनदिन दिन उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / प्रतिनिधी :** विक्रोळी कन्नमवार नगरातील ज्येष्ठ नागरिक प्रभात मित्र मंडळाचा २९ वा वर्धापनदिन सोहळा दि.१७ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता विकास हायस्कूल सभागृहात उत्साहात साजरा करण्यात आला.प्रभात मित्र मंडळाचे अध्यक्ष विवेक गायकवाड अध्यक्ष स्थानी होते.प्रमुख पाहुणे म्हणून फेस्कॉम मुंबईचे सल्लागार विजय औंधे उपस्थित होते.कार्यक्रमामध्ये प्रभाग क्रमांक ११८ च्या शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या नवनिर्वाचित नगरसेविका सौ.सुनिता चंद्रशेखर जाधव यांचा सत्कार मंडळाचे खजिनदार गौतम नि.डांगळे यांच्या शुभ हस्ते शाल,श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन करण्यात आला.प्रास्ताविक मंडळाचे सचिव ज्येष्ठ पत्रकार नासिकेत पानसरे यांनी केले.मान्यवरांच्या हस्ते स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले. पाहुणे फेस्कॉम मुंबई चे सल्लागार विजय औंधे यांनी आपले मंडळ फेस्कॉम शी संलग्न असल्यामुळेच तुमच्या मंडळास फेस्कॉमची मदत लागली तर आम्ही ती नक्कीच करू असे आश्वासन दिले. मंडळाचे सल्लागार व मार्गदर्शक माजी



महापौर दत्ता दळवी यांनी कन्नमवारच्या जुन्या आठवणींना उजाळा दिला. कनमवार नगर ची ओळख आता टॉवर नगर झाली आहे.असे आर्वजून सांगितले.सत्कारमुर्ती नवनिर्वाचित नगरसेविका सौ.सुनिता चंद्रशेखर जाधव यांनी मी निवडणूकीत उभी राहिल्यानंतर पहिल्यांदाच आशिर्वाद घ्यायला प्रभात च्या ज्येष्ठ नागरिकांकडे आले होते. तुमच्याच आशिर्वाद मुळे मी निवडून आले आहे.याबद्दल कृतज्ञतापूर्वक आभार मानले.तुम्ही कुठलीही समस्या माझ्याकडे घेऊन या.मी ती सोडविणार अशी ग्वाही त्यांनी दिली.शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उपविभाग प्रमुख चंद्रशेखर जाधव यांनी माजी मंत्री लीलाधर डोके यांच्या सोबत मंडळास अनेक वेळा भेटी दिल्याचे सांगून मंडळाच्या कार्यप्रणालीचे कौतुक केले.

याप्रसंगी मंडळाचे माजी अध्यक्ष व ज्येष्ठ वृत्तपत्रलेखक कृष्णा काजरोळकर यांना महाराष्ट्र मराठी मुक्त पत्रकार संघाचा पत्रकारितेतील ४० वर्ष पूर्ण झाल्याबद्दल व सामाजिक सेवेबद्दल पुरस्कार देऊन गौरविण्यात आले त्याबद्दल त्यांचा व मंडळाचे माजी अध्यक्ष व विद्यमान कार्यकारणी सदस्य सुरेश सरनोबत यांची फेस्कॉम मुंबई च्या कार्यकारिणी सदस्य पदी निवड झाल्याबद्दल या दोघांचा सत्कार विजय औंधे यांच्या हस्ते करण्यात आला.७५ वर्ष पूर्ण झाल्याबद्दल मंडळाच्या ज्येष्ठ नागरिकांचा व मंडळाचे ८५ वर्षाचे माजी सैनिक वासुदेव तानाजी जंगम यांचा सत्कारही करण्यात आला. मंडळाच्या ज्येष्ठ नागरिकांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. त्याचा देखील पारितोषिक वितरण समारंभ मान्यवरांच्या हस्ते पार पडला.

कार्यक्रमास फेस्कॉमचे सल्लागार शरद डिचोलकर,शिवसेना उबाठा शाखाप्रमुख अभय राणे,मंडळाचे सल्लागार व इंडियन मेडीकल असोशिएशन एनईबीएस,शाखेचे अध्यक्ष हरिश पांचाळ, राजेंद्र नवघणे,औदुंबर सराफ,समाजसेविका जयश्रीदिदी खिलारी,शिवसेना उबाठा विक्रोळी विधानसभा संघटक व मंडळाचे सल्लागार शंकर ऊर्फ नाना ढमाले,माजी महिला शाखाप्रमुख अहिल्या थोरवे,दिशा वेल्फेअर ग्रुप चे अध्यक्ष दिनेश बैरीशेट्टी,विक्रोळीकर विकास मंचचे अध्यक्ष संजय येवले आदि मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मंडळाचे अध्यक्ष विवेक गायकवाड, उपाध्यक्ष निवृत्ती मस्के,सचिव ज्येष्ठ पत्रकार नासिकेत पानसरे, उपसचिव श्रध्दानंद निकम, खजिनदार गौतम नि.डांगळे,भूमैया सोमा,राजाराम क्षीरसागर ,बबन माने व व्यवस्थापन समितीने बरीच मेहनत घेतली होती.कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सुरेश सरनोबत यांनी केले होते. प्रारंभी अविट सुमधूर गाण्याचा नजराणा,बाणा महाराष्ट्राचा हा प्रभात मित्र मंडळाच्या गायकांचा कार्यक्रम सादर करण्यात आला.

# साखरीटोला जि. प. शाळेत पालकांचा एल्गार; मुख्याध्यापकांच्या 'डिजिटल' कार्यपद्धतीवर गंभीर आरोप

**दैनिक युवक आधार**

**सचिन बन्सोड/ प्रतिनिधी जिल्हा (गोंदिया ) :** तालुक्यातील साखरीटोला येथील जिल्हा परिषद शाळा व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. जी. जे. परदेशी यांच्या कार्यपद्धतीबाबत पालकांनी तीव्र संताप व्यक्त केला असून, त्यांच्या विरोधात जिल्हा शिक्षणाधिकाऱ्यांकडे सामूहिक तक्रार दाखल केली आहे. मुख्याध्यापकांनी कोणतीही रीतसर प्रक्रिया न पाळता शाळा व्यवस्थापन समिती (SMC) चक्क व्हॉट्सॲप आणि माईकद्वारे रद्द केल्याचा खळबळजनक आरोप या तक्रारीत करण्यात आला आहे.

**काय आहे पालकांचे म्हणणे?**

मिळालेल्या माहितीनुसार, शाळेचा कारभार गेल्या काही दिवसांपासून चर्चेत आहे. मुख्याध्यापकांनी व्यवस्थापन समिती बरखास्त



केल्याची माहिती डिजिटल माध्यमातून देऊन पालकांना विश्वासात न घेता मनमानी निर्णय घेण्याचा सपाटा लावला असल्याचे पालकांचे म्हणणे आहे. विशेष म्हणजे, शाळेच्या कार्यालयात आजही अनेक वर्षे जुने समितीचे फलक लावलेले असून त्याद्वारे दिशाभूल केली जात असल्याचा दावा ग्रामस्थांनी केला आहे.

**शाळेत गैरसोयींचे साम्राज्य?**

पालकांनी अर्जात नमूद केल्यानुसार, शाळेत मागील वर्षी बसवलेले तीन वॉटर फिल्टर धूळ खात पडून आहेत. नवीन शैक्षणिक सत्र सुरू होऊनही विद्यार्थ्यांना पिण्याचे शुद्ध पाणी मिळत नाही. शौचालयांची अवस्था अत्यंत दयनीय असून नवीन बांधलेल्या शौचालयांना कायम कुलूप लावले जात असल्याचे पालकांनी निदर्शनास आणून दिले आहे. तसेच, शासन निर्णयाला हरताळ फासून तासिका तत्त्वावर अपात्र शिक्षिकेची नियुक्ती केल्याचा गंभीर आरोपही तक्रारदारांनी केला आहे.

**पालकांना 'एफ.आय.आर.'ची भीती?**

शाळेतील समस्यांबाबत विचारणा करण्यासाठी गेलेल्या पालकांशी मुख्याध्यापक अभद्र भाषेत संवाद साधतात आणि विनापरवानगी शाळेत आल्यास 'एफ.आय.आर.' (FIR) दाखल करण्याची धमकी देतात, असे पालकांनी तक्रारीत नमूद केले आहे. आज दि. १५ जानेवारी रोजी संतप्त पालकांनी शाळेला आकस्मिक भेट दिली असता मुख्याध्यापक स्वतः गैरहजर असल्याचे दिसून आले.

**प्रशासकीय कारवाईची मागणी:**

सुमारे ४० ते ५० पालकांच्या स्वाक्षरीसह हा तक्रार अर्ज जिल्हा शिक्षणाधिकारी गोंदिया आणि गट शिक्षणाधिकारी सालेकसा यांना सादर करण्यात आला आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित मुख्याध्यापकांवर कडक कारवाई करण्याची मागणी साखरीटोला परिसरातील पालक वर्गाकडून केली जात आहे.

**पत्रकारांसाठी कायदेशीर टीप:**

सदर वृत्त हे पालकांनी दिलेल्या लेखी तक्रारीच्या आणि प्रत्यक्ष भेटीत केलेल्या आरोपांच्या आधारे प्रसिद्ध करण्यात आले आहे. यामध्ये कोणत्याही व्यक्तीची वैयक्तिक बदनामी करण्याचा हेतू नसून सार्वजनिक हिताच्या दृष्टीने समस्या मांडण्यात आल्या आहेत.

## रस्त्यालगत कंटेनरची जीवघेणी पार्किंग, कारवाईची मागणी

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** पनवेल तालुक्यातील कोन- सावळा मार्गे रोडवर मोठमोठे गोडाऊन लॉजिस्टिक असल्या कारनाने रात्री त्या कंटेनरची रस्त्यालगत पार्किंग केली जाते. त्यामुळे याचा त्रास प्रवासी, स्थानिकांना होत आहे.कोन-सावळा मार्गे जाणारा रस्ता हा सध्या लॉजिस्टिक आणि गोडाऊनचे मोठे केंद्र बनले आहे. यामुळे रात्रीच्या वेळी रस्त्याच्या दुतर्फा होणारी कंटेनरची पार्किंग ही केवळ वाहतुकीसाठी अडथळा नसून अपघातांनाही निमंत्रण देणारी ठरत आहे.या समस्येमुळे प्रवाशांना आणि स्थानिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. रात्रीच्या वेळी अंधारात उभे असलेले कंटेनर नीट दिसत नाहीत, ज्यामुळे दुचाकी आणि चारचाकी वाहनांचे भीषण अपघात होऊ शकतात. यापूर्वी झालेले देखील आहेत पण त्याकडे दुर्लक्ष केले जाते. अनेक गोडाऊन मालकांकडे स्वतःची पुरेशी पार्किंग नसल्यामुळे ते सार्वजनिक रस्त्याचा वापर करतात. यावर उपाययोजना करणे गरजेचे आहे. स्थानिक ट्राफिक पोलीस याकडे दुर्लक्ष करताना दिसत आहेत. अजुन किती सर्वासामान्य नागरिकांचे अपघात हवे आहेत याला नक्की जबाबदार कोण जर याकडे दुर्लक्ष केले तर नागरिकांना आंदोलनाची भूमिका घ्यावी लागेल असे बोलले जात आहे.

# कळमनुरी उपजिल्हा रुग्णालयात महिला तज्ज्ञ डॉक्टर नियुक्तीची मागणी

## (डॉ सतिष पाचपुते यांचा उपोषणाचा इशारा)

**दैनिक युवक आधार**

**तालुका प्रतिनिधी कळमनुरी :** कळमनुरी येथील उपजिल्हा रुग्णालयात इमारत, वैद्यकीय उपकरणे व विविध सोयीसुविधा उपलब्ध असतानाही महिला तज्ज्ञ डॉक्टरांचे पद रिक्त असल्याने रुग्ण महिलांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. महिला तज्ज्ञ डॉक्टर नसल्यामुळे अनेक महिलांना उपचारासाठी हिंगोली जिल्हा रुग्णालयात पाठविण्यात येत असून, याचा सर्वाधिक फटका गरीब व गोरगरीब महिलांना बसत आहे.

कळमनुरी तालुका हा आदिवासी भाग असून येथे ऊसतोड कामगार, वीटभट्टी कामगार तसेच मजुरीवर अवलंबून असलेल्या कुटुंबांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. या भागातील महिलांसाठी कळमनुरी उपजिल्हा रुग्णालय हे उपचाराचे प्रमुख केंद्र आहे. मात्र तज्ज्ञ महिला डॉक्टर उपलब्ध नसल्यामुळे गर्भवती महिला व स्त्रीरोगाशी संबंधित रुग्णांना वेळेवर उपचार मिळत नाहीत. परिणामी त्यांना खासगी रुग्णालयात किंवा हिंगोली येथे जावे लागते, ज्यामुळे त्यांच्यावर अतिरिक्त आर्थिक भार पडत आहे.

या पार्श्वभूमीवर कळमनुरी उपजिल्हा रुग्णालयात तातडीने महिला तज्ज्ञ डॉक्टरांची नियुक्ती करण्यात यावी, अशी ठाम मागणी डॉ. सतीश पाचपुते यांनी केली आहे. प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केल्यास आपण उपोषणाला बसणार असल्याचे तसेच भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

महिला तज्ज्ञ डॉक्टरांची नियुक्ती झाल्यास परिसरातील हजारो महिलांना स्थानिक पातळीवर दर्जेदार उपचार मिळणार असून माता व बालमृत्यूचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल. त्यामुळे प्रशासनाने याबाबत तातडीने निर्णय घ्यावा , अशी जोरदार मागणी नागरिकांतून होत आहे.

# बाळापुरच्या मातीतून उगवले देशरक्षक!

**श्रीनिवास बासरोड CRPF, लोकेश पलीकोंडावार CISF आणि राहुल घाटे BSF यांची भारतीय सैन्यात निवड**



BSF
राहुल सुनिल घाटे



CISF
लोकेश संतोष पल्लीकोंडावार



CRPF
श्रीनिवास पोतन्ना बासरोड

**दैनिक युवक आधार**

**धर्माबाद प्रतिनिधी गिरमाजी सुर्यकार :** बाळापुर गावाने अभिमानाचा नवा शिखर गाठला आहे. गावाचे तीन धैर्यशील आणि मेहनती तरुण – श्रीनिवास बासरोड (CRPF), लोकेश पलीकोंडावार (CISF) आणि राहुल घाटे (BSF) – त्यांच्या अपार जिद्द, मेहनत आणि ठाम इच्छाशक्तीच्या जोरावर भारतीय सैन्यात निवडले गेले आहेत.ही निवड केवळ त्यांच्या वैयक्तिक यशाचे प्रतीक नाही, तर त्यांच्या कठीण परिस्थितीतून त्यांनी दाखवलेला धैर्य आणि आत्मविश्वास आहे. या तरुणांचे आई-वडील आर्थिक दृष्ट्या हलाखीत असून, घर चालवण्यासाठी मोलमजुरी करत होते. अशा परिस्थितीतही या तरुणांनी शिक्षण सोडले नाही; मेहनत, कष्ट आणि धैर्याने त्यांनी आपले स्वप्न पूर्ण करण्यासाठी दिवस-रात्र प्रयत्न केले.श्रीनिवास बासरोड यांनी CRPF मध्ये निवड मिळवून देशाच्या सुरक्षेसाठी आपली जबाबदारी स्वीकारली, लोकेश पलीकोंडावार यांनी CISF मध्ये प्रवेश करून देशसेवेची शपथ घेतली, तर राहुल घाटे BSF मध्ये निवडून आपल्या सीमांचे रक्षण करण्यासाठी सज्ज झाला.गावकांनी या तरुणांच्या यशावर प्रचंड आनंद व्यक्त केला असून, हे यश संपूर्ण बाळापुरसाठी प्रेरणादायी ठरले आहे. त्यांच्या मेहनत, जिद्द, धैर्य आणि कुटुंबीयांच्या अपार संघर्षामुळे त्यांनी दाखवलेला आदर्श गावातील प्रत्येक तरुणासाठी मार्गदर्शन ठरेल.

गावातील शिक्षक, मित्रपरिवार आणि कुटुंबीय त्यांच्या यशावर अभिमान व्यक्त करत आहेत. त्यांच्या या प्रयत्नांमुळे बाळापुरच्या युवकांना कठोर मेहनत, शिक्षणाचे महत्त्व आणि धैर्याने अडचणींवर मात करण्याची प्रेरणा मिळाली आहे.या तीन तरुणांच्या यशामुळे बाळापुर गावाचा गौरव राज्यस्तरावर पोहोचला असून, बाळापुरचा अभिमान शिखरावर पोहोचला आहे. त्यांच्या संघर्षमय जीवनकथेतून हे स्पष्ट होते की, निर्धार, मेहनत आणि धैर्य असल्यास कोणतीही परिस्थिती अडथळा ठरू शकत नाही.

## पनवेल तालुक्यात स्पर्श - कुष्ठरोग जनजागृती अभियान


**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** पनवेल तालुक्यात स्पर्श - कुष्ठरोग जनजागृती अभियान 30 जानेवारी ते 13 फेब्रुवारी 2026 या दरम्यान राबविण्यात येणार आहे. समाजा मध्ये कुष्ठरोगा बाबत असलेले गैरसमज दूर करण्याकरिता जास्तीत जास्त जनजागृती व्हावी ह्या उद्देशाने १९ जानेवारी रोजी पनवेल तालुक्यातील खाजगी वैद्यकीय व्यावसायिकांची मिरॅकल हॉस्पिटल येथे सभा घेण्यात आली. खाजगी वैद्यकीय व्यावसायिकांनी आपल्या क्लिनिकमध्ये येणाऱ्या रुग्णांची तपासणी करून त्यांना कुष्ठरोगा बाबत माहिती देण्यात यावी, तसेच काही संशयित रुग्ण आढळल्यास त्यांना जवळच्या प्राथमिक आरोग्य केंद्रात पाठवण्यात यावे, याबाबत तालुका आरोग्य अधिकारी डॉ.अपर्णा पवार यांनी मार्गदर्शन केले. या सभेकरिता डॉ.वैभव मोकल-PDGPA चे प्रेसिडेंट यांच्या सोबत अनेक डॉक्टर उपस्थित होते.

# विंचूर परिसरात बिबट्याचा मुक्त संचार; नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण

**दैनिक युवक आधार**

**राजेश भडांगे/निफाड तालुका प्रतिनिधी :** विंचूर (ता. निफाड) परिसरात मागील काही दिवसांपासून बिबट्याचा वावर वाढल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. शेतशिवार, सुभाष नगर, नेवगे वस्ती व जेऊघाले वस्ती या भागांत बिबट्याचे वारंवार दर्शन होत असल्याच्या घटना समोर येत असून, त्यामुळे शेतकरी, शाळकरी मुले व महिलांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.मिळालेल्या माहितीनुसार, विंचूर गावालगतच्या शेतांमध्ये रात्रीच्या वेळी बिबट्याचा मुक्त



संचार दिसून येत आहे. काही ठिकाणी पाळीव जनावरांवर हल्ल्याच्या घटना घडल्या असून कुत्रे बिबट्याने उचलून नेल्याच्या तक्रारी ग्रामस्थांनी केल्या आहेत. परिणामी नागरिकांनी रात्रीच्या वेळी घराबाहेर पडणे टाळण्यास सुरुवात केली आहे.या घटनेची माहिती मिळताच वनविभागाच्या पथकाने परिसरात पाहणी सुरू केली असून बिबट्याच्या पावलांचे ठसे आढळून आले आहेत. बिबट्याला जेरबंद करण्यासाठी तातडीने पिंजरे लावावेत, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. मात्र अद्याप बिबट्याला पकडण्यात यश आलेले नाही.दरम्यान, वनविभागाच्या वतीने नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. रात्री एकटे बाहेर न पडणे, शेतात काम करताना गटाने जाणे, लहान मुलांची विशेष काळजी घेणे तसेच जनावरांना सुरक्षित ठिकाणी बांधण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.बिबट्याच्या वाढत्या वावरामुळे विंचूर परिसरातील जनजीवन विस्कळीत झाले असून, लवकरात लवकर बिबट्याला पकडून सुरक्षित ठिकाणी हलवावे, अशी जोरदार मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. वनविभाग याबाबत कोणती ठोस उपाययोजना करतो, याकडे संपूर्ण परिसराचे लक्ष लागले आहे.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# कर्जत येथे महेंद्रशेठ घरत यांना 'आगरी समाज भूषण पुरस्कार' प्रदान !

## आगरी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध : महेंद्रशेठ घरत

**दैनिक युवक आधार**

**उलवे, वार्ताहर :** कर्जत तालुका आगरी समाज संघटनेच्या वतीने हुतात्मा हिराजी गोमाजी पाटील यांची ११२ वी जयंती मानिवली या त्यांच्या जन्मगावी सोमवारी साजरी करण्यात आली. देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात आपल्या प्राणांची आहुती देणारे हिराजी गोमाजी पाटील यांच्या जयंतीचा सोहळा आगरी समाज संघटनेच्या वतीने थाटात साजरा करण्यात आला.

यावेळी महेंद्रशेठ घरत यांच्या अथांग समाजकार्याची दखल घेण्यात आली. हुतात्मा हिराजी गोमाजी पाटील यांच्या जयंतीदिनी आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि कॉंग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांना कर्जत तालुका आगरी समाज संघटनेच्या वतीने 'आगरी समाज भूषण पुरस्कार' देऊन सोमवारी (ता. १९ ) गौरविण्यात आले.

यावेळी महेंद्रशेठ घरत सत्काराला उत्तर देताना म्हणाले, "मी सर्वधर्म समभाव मानणारा आहे. त्यामुळे समाजातील प्रत्येक गरजूंसाठी सहकार्याची भूमिका कायम आहे. मी गेली ३८ वर्षे सामाजिक काम करतोय. हजारोंच्या हातांना काम दिले. त्यामुळे अनेकांच्या चुली पेटल्या. विद्यार्थिदशेत असताना १९८४ च्या प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या गौरवशाली, शौरशाली, ऐतिहासिक आंदोलनात माझी बारावीची परीक्षा तोंडावर आलेली असतानाही सहभागी झालो. हा समाजकार्याचा वारसा मला आई-वडिलांकडून मिळाला आहे. वडिलांनी संयुक्त महाराष्ट्र चळवळीत कारावास भोगला. त्यांनी त्या काळात दिनदलितांना सहकार्य केले आहे, देणग्याही दिलेल्या आहेत. त्यामुळे मी त्यांचा आणि दिवंगत



ज. आ. भगत साहेबांचा वारसदार म्हणून समाजकार्य करीत आहे. त्यामुळे माझी कर्जतच्या आगरी समाजाने दखल घेतली याचा निश्चितच आनंद आहे. आगरी समाजाने केलेला हा घरचा सत्कार आहे, असे मी मानतोय. आपणास स्वातंत्र्य मिळाले, परंतु सध्याचे राजकारण हे पैशांभोवती फिरत आहे, हा चिंतेचा विषय आहे. लोकशाहीला हे मारक आहे. कर्जतमध्ये आगरी समाज संघटनेचे काम उत्तम आहे. समाजाचा अभिमान हवाच, त्यामुळेच जगाच्या व्यासपीठावर मी आगरी म्हणून अभिमानाने जातो. दिबांचा त्याग अतुलनीय आहे. त्यामुळे त्यांचे कार्य मी पुढे नेतोय."

शेकडो गरीब-गरजूंना घर बांधकामासाठी मदत, अनेकांना बंगले, फ्लॅट, फोर व्हीलर, टू व्हीलर भेट म्हणून दिल्या. रुग्णांसाठी तर ते देवदूतासमान काम करीत आहेत. शेकडो विद्यार्थी दत्तक घेऊन त्यांच्या शिक्षणाचा खर्चही त्यांनी उचललेला आहे. ज्या पालकांना लाखो रुपये फी भरून इंग्रजी माध्यमाचे शिक्षण घेता येत नाही त्यांच्यासाठी आईच्या नावाने यमुनाबाई सामाजिक शैक्षणिक संस्था स्थापन करून अत्यल्प फी घेऊन शाळा आणि ज्युनियर महाविद्यालय चालवले जाते. संगणक आणि रुग्णवाहिकांचे वाटप आजघडीलाही सुरू आहे. अशा शेकडो कामांची माहिती घेऊन कर्जत तालुका आगरी समाज संघटनेने महेंद्रशेठ घरत यांना आगरी समाज भूषण पुरस्कार दिल्याने परिसरात त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

यावेळी कर्जत तालुका आगरी समाज संघटनेचे सावळाराम ठाकूर गुरुजी, तुकाराम कोळंबे यांचा सन्मानही महेंद्रशेठ घरत यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी कर्जत-नेरळ परिसरातील आठ ब्रास बँड पथकांनी उत्तमोत्तम देशभक्तीपर गाणी सादर केली.

यावेळी आगरी युथ फाऊंडेशनचे अध्यक्ष नीलेश पाटील यांनी समाजबांधवाना मार्गदर्शन केले. तसेच दिबांच्या कार्याची महती सांगितली. यावेळी नगरसेवक किरण पेमारे, उमेश मोरे, राज पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. कर्जत तालुका आगरी समाज संघटनेचे अध्यक्ष संतोष पेरणे यांनी प्रास्ताविक केले आणि आभारही मानले.

यावेळी संघटनेचे सभासद आणि पदाधिकारी उपस्थित होते.

---

## खांडवी जि.प.शाळा शालेय शिक्षण समितीच्या अध्यक्षपदी दत्ता बरकुले तर उपाध्यक्षपदी रामेश्वर बरकुले यांची बिनविरोध निवड

**दैनिक युवक आधार**

**परतूर -जालना (अशोक ठोके) :** खांडवी येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेच्या शालेय शिक्षण समितीच्या अध्यक्षपदी दत्ता रावसाहेब बरकुले व उपाध्यक्ष पदी रामेश्वर रावसाहेब बरकुले यांची सर्वानुमते बहुमताने बिनविरोध निवड झाली आहे. शालेय शिक्षण समितीच्या सदस्य पदी विठ्ठल सोळंके, दत्ता बरकुले, डिगांबर बरकुले, लक्ष्मण सराटे , उत्तम साळवे, शेख अन्सार, अश्विनी माने यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

या प्रसंगी अध्यक्ष, उपाध्यक्ष व समितीने गावकरी व पालकांचे आभार मानले.सदरील



निवड बिनविरोध करण्यासाठी दिपक( अण्णा) बरकुले , गणेश हरकळ , दत्ता बरकुले, भिमाशंकर बरकुले , अंकुश तात्या बरकुले, गोपाळ बरकुले , हनुमान बरकुले यांनी परीश्रम घेतले या प्रसंगी गावातील नागरिक व पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

---

## संत तुकाराम इंटरनॅशनल स्कूल येथे हळदी कुंकू समारंभ संपन्न

**दैनिक युवक आधार**

**गेवराई प्रतिनिधी :** गेल्या अनेक वर्षांपासून महिलांच्या सन्मानाची परंपरा जपणाऱ्या उपक्रमशील संत तुकाराम इंटरनॅशनल स्कूल मादळमोही येथे माता पालक मेळावा व भव्य हळदीकुंकू सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.मकरसंक्रांतीनिमित्त हा हळदीकुंकू समारंभ शनिवार रोजी सायंकाळी चार ते सात या वेळेत संपन्न.

सामाजिक भान जपत शाळेच्या सर्व आदर्श महिला पालकांसाठी या सोहळ्याच्या निमित्ताने हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून दिले.हळदीकुंकू हा प्रत्येक महिलेसाठी सन्मान व सौभाग्याचा प्रतिकात्मक दिवस मानला जातो. हीच परंपरा जपत दरवर्षी मकरसंक्रांतीनिमित्त हा उपक्रम सातत्याने राबविला जात आहे

कार्यक्रमाची सुरुवात राजमाता जिजाऊ ,क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले ,पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. यानंतर महिलांसाठी विविध



स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी स्कूलच्या संचालिका श्रीमती शिवनंदा गावडे यांनी मार्गदर्शन केले या वेळी विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढ ,सुरक्षेबाबत माहिती देण्यात आली.तसेच अभ्यासाबरोबरच सर्वांगीण विकासासाठी पालकांनी विद्यार्थ्यांचे आरोग्य, स्वच्छता, नियमितता आदी बाबींकडे लक्ष द्यावे असे आव्हान करण्यात आले. या वेळी माता पालकांना हळदी कुंकू वाण वाटण्यात आले.महिलांनी घरासोबतच आपल्या आरोग्याकडे लक्ष द्यावे म्हणून त्यांच्यासाठी खास खेळाचे आयोजन केले होते. खेळाच्या प्रत्येक स्पर्धेतील प्रथम तीन क्रमांक काढण्यात आले.त्यानंतर स्पर्धेतील विजेत्या महिलांना पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले. या कार्यक्रमासाठी श्रीमती आशा रसाळ ,श्रीमती सारिका जाधव,अबोली भोपळे ,श्रीमती कल्पना जाधव ,श्रीमती निकिता चव्हाण तसेच शाळेचे संस्थापक तथा प्राचार्या श्री भिमराव गावडे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन झाले.

---

## बोलींचा जागर' कार्यक्रमाचे सीकेटी महाविद्यालयात आयोजन

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी :** 'बोलीभाषांचे जतन व संवर्धन ही काळाची गरज असून आगरी बोलीचे वैभव जपण्यासाठी महाराष्ट्र शासन आणि भाषा संचालनालय अत्यंत स्तुत्य उपक्रम राबवत आहे', असे प्रतिपादन चांगू काना ठाकूर कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य मा. प्रा. डॉ. एस. के. पाटील यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात केले. जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयात महाराष्ट्र शासन व मराठी भाषा संचालनालय यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करण्याच्या उद्देशाने 'बोलींचा जागर' हा विशेष सांस्कृतिक कार्यक्रम सोमवारी (दि. १९ जानेवारी २०२६) उत्साहात संपन्न झाला, त्यावेळी ते बोलत होते. महाराष्ट्र राज्याच्या भाषा संचालनालयाच्या वतीने दरवर्षी १४ जानेवारी ते २८ जानेवारी या कालावधीत मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करण्यात येतो. याचेच औचित्य साधून रायगड जिल्ह्यातील आगरी बोलीच्या संवर्धनासाठी 'आगरी बोलीचा जागर' या कार्यक्रमासाठी चांगू काना ठाकूर महाविद्यालयाची निवड करण्यात आली. या कार्यक्रमाचे संयोजन मराठी विभागाच्या वतीने विभाग प्रमुख प्रा. मा. म. अंबुलगेकर यांनी केले.

ज्ञानाची, विचारांची आणि संस्कृतीची यात्रा असणाऱ्या ग्रंथदिंडीने कार्यक्रमाची सुरुवात झाली. ग्रंथ दिंडीसाठी पनवेल परिसरातील भजनी मंडळाचा सहभाग होता. हरिनामाच्या गजरातून ग्रंथदिंडीला भक्तीचा, अध्यात्माचा आणि संत परंपरेचा सजीव स्पर्श लाभला. महाविद्यालयाच्या कला विभाग , एन. एस. एस. आणि डी. एल. एल. इ. विभागाचे विद्यार्थी आणि महाविद्यालयातील अनेक प्राध्यापक या दिंडीत सहभागी झाले.

खांदा कॉलनी परिसरात निघालेल्या या शोभायात्रेत भजनाच्या तालावर ठेका धरत, नाचत- गात सर्व भक्तिमय वातावरणात रंगून गेले.



त्यानंतर मुख्य कार्यक्रमाला प्रारंभ झाला. यावेळी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते प्रतिमापूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले. महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागाच्या विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र गीत आणि स्वागत गीत सादर केले. मान्यवरांचे औपचारिक स्वागत झाल्यानंतर शासनाची भूमिका स्पष्ट करणारे प्रास्ताविक श्रीमती मधुरा देसाई यांनी मांडले.

कार्यक्रमात आगरी बोली भाषेच्या तज्ज्ञ मा. डॉ. प्रतिमा टेंबे यांनी 'आगरी बोलीचा उगम , विकास, स्वरूप आणि वैशिष्ट्ये' स्पष्ट केली, तसेच मा. श्री. चंद्रकांत मढवी यांनी 'आगरी बोलींचा वापर, सद्यस्थिती , जतन आणि संवर्धन' या विषयावर उपस्थितांना मार्गदर्शन केले. भाषा तज्ज्ञांनी आपल्या भाषणातून मराठीतील आगरी बोलीचे सांस्कृतिक व भाषिक महत्त्व विशद केले. यानंतर आगरी बोलीतील कविता पुंडलिक म्हात्रे, अजय भोईर, प्रकाश पाटील यांनी सादर केल्या. आगरी बोलीतील लोकगीते अर्थात धवळे गाणाऱ्या धवळारीन श्रीमती बानुबाई ठाकूर यांचे धवळेगायन कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरले. बानुबाई यांनी आपल्या अनोख्या शैलीतून मुखोद्गत धवळे सादर करून श्रोत्यांची मने जिंकली. आगरी बोलीतील नाटक याबाबत मोहन भोईर यांनी मत व्यक्त केले. कार्यक्रमाचा समारोप या मराठी विभाग प्रमुख प्रा. मा. म. अंबुलगेकर यांनी केलेल्या आभार प्रदर्शनाने झाला. कार्यक्रमाचे सूत्र संचालन मराठी विभागाच्या सहाय्यक प्राध्यापक नम्रता कडू यांनी केले. शेवटी राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

हा कार्यक्रम आगरी बोलींच्या समृद्ध परंपरेचे दर्शन घडवणारा ठरला असून विद्यार्थी, परिसरातील इतर महाविद्यालयांचे प्राध्यापक व रसिकांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती लाभली.

---

## दीपक घिगे यांना राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान

**दैनिक युवक आधार**

**वार्ताहर :** विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत शिक्षकांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. विविध उपक्रमांच्या माध्यमातून शिक्षक विद्यार्थ्यांचे भावी जीवन समृद्ध करीत असतो,त्यामुळे विविध सेवाभावी संस्था शिक्षकांच्या सेवेची दखल घेत आहेत. अहिल्यानगर येथील बी दि चेंज फाउंडेशन ह्या सेवाभावी संस्थेच्या वतीने दरवर्षी समर्पित भावनेने शैक्षणिक सेवा बजावित असलेल्या शिक्षकांना राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात येत असते.ह्या वर्षी मुरबाड तालुक्यात पंचायत समिती मध्ये शिक्षक पदावर कार्यरत



असलेल्या दीपक शंकर घीगे यांना आदर्श शिक्षक पुरस्कार देवून गौरविण्यात आले आहे. गेली अनेक वर्षे सामाजिक बांधिलकीचा वारसा जपत दीपक घिगे हे आपल्या शाळेत विविध उपक्रम राबवत आहेत.आपल्या सेवेच्या काळात त्यानी प्रामाणिकपणे सेवा केल्याने त्यांच्या ह्या पुरस्काराने शिक्षक वर्गात आनंद व्यक्त केला जात आहे. सन्मानचिन्ह , शाल,पुष्पगुच्छ देवून मान्यवरांच्या शुभहस्ते त्यांना गौरविण्यात आले. मुंबई मध्ये पार पडलेल्या ह्या पुरस्कार सोहळ्यास माजी सैनिक अधिकारी अरुण भंडारे,अभिनेत्री निवेदिता पगार तसेच अमृत रोहोम उपस्थित होते.संस्थेचे अध्यक्ष मयुर धोकचौले आणि विश्वस्त अभिषेक तुपे यांच्या नियोजनाखाली हा सोहळा संपन्न झाला. मुरबाड तालुक्यातील एका दुर्गम भागात सेवा करणाऱ्या दीपक घिगे यांना हा मानाचा पुरस्कार मिळाल्याने विविध सेवाभावी संस्थांच्या वतीने त्यांचे अभिनंदन होत आहे.

---

## पत्रकार , प्रा. सुरज गोंडाने यांचा वाढदिवस भंडारा येथे उत्साहत साजरा



**दैनिक युवक आधार**

**संजीव भांबोरे :** भंडारा -पत्रकार, बिगर ग्रामीण सहकारी पतसंस्था वाकेश्वर संस्थेचे उपाध्यक्ष तथा प्रा. सुरज गोंडाणे यांचा वाढदिवस भंडारा येथे त्यांना पुष्पगुच्छ व केक कापून येथे उत्सव साजरा करण्यात आला. यावेळी प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघटनेचे राज्य उपाध्यक्ष पंकज वानखेडे , प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघटनेचे राज्य सरचिटणीस संजीव भांबोरे ,भंडारा लोकमत चे उपसंपादक देवानंद नंदेश्वर, प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघटनेचे विदर्भ विभागीय सरचिटणीस प्राध्यापक शेखर बोरकर ,भंडारा तालुका सरपंच संघटनेचे अध्यक्ष बाबूलाल भोयर, महेंद्र तिरपुडे, अमरदीप बोरकर, संदीप भोयर, धर्मेंद्र पडोळे, नरेश साखरे, निवांत वासनिक, भिक्षोक साखरे, यावेळी प्रामुख्याने उपस्थित होते.

---

## जिजाऊ सावित्री जयंती सप्ताह

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी ज्योत्सना करवाडे /विदर्भ संपादक :** महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, जिल्हा नागपूर व डॉ.बाबासाहेब आंबेडकर मिशन यांच्या संयुक्त विद्यमाने

क्रांती ज्योती सावित्री आई फुले यांची १९५ वी जयंती डॉ आंबेडकर मिशन हाल तळघर परिसर, लष्करीबाग नागपूर रोजी साजरी करण्यात आली.कार्यक्रमाचे अध्यक्ष आयु.विजयाताई चंद्रकांत श्रीखंडे, सावित्री बाई फुले प्रेरणां पुरस्कर २०२० प्राप्त विभागीय सदस्या महाअंनिस ह्या होत्या. प्रमुख अतिथी मृणाली दहिवडे , समाजसेवीका आंबेडकरी विचारवंत नागपूर आणि आयु मनीषा जामगडे*सचिव,भारतीय महाबौद्ध सभा महिला विंग नागपूर यांनी सवित्री बाई यांना आपली श्रद्धाजली पर समयोचित भाषणे केली.मा.शांताराम रंगारी , समाजभूषण पुरस्कार डॉ.बाबासाहेब आंबेडकर मिशन यांनी आपले विचार व्यक्त केले.आयु. देवयानी भगत *सावित्री बाई फुले प्रेरणां पुरस्कर २०२५ प्राप्त महाअंनिस नागपूर यांनी प्रास्तविक केले.मा. रामभाऊ डोंगरे, राज्य कार्यकारिणी सदस्य, महाअंनिस यांनी महाराष्ट्र आंधश्रद्धा निर्मुलन समिती चे कार्याचे स्मरण आणि चमत्काराचे सादरीकरण केले.

विशेष उपस्थिती बी टी वाहणे, सामाजिक कार्यकर्ता हे होते. तसेच प्रख्यात साहित्यिक आणि कवीयित्री रोशनी गणविर,'अंबर', प्रितीबाला बोरकर,रजनी प्रभुदास फुलझेले ,प्रतिभा संहारे,अर्चना चंदनखेडे विजया ठाकरे व चित्तरंजन चोरे यांनी कवयित्री सावित्री आई फुले वर कविता सादर केल्या.या प्रसंगी *जोतिबा का संघर्ष* या



नाटकाचे प्रस्तुति व शोभा गौतम पाटील यांनी सावित्री फुले यावर एकपात्री नाटिका सादर केली.

देवानंद बडगें , गौतम पाटील, मंगला गाणार, देवयानी भगत, गंगा खेडकर यांनी गीत सादर करण्यात आली .मंगला गाणार यांनी आभार व्यक्त केले.डॉ सुनिल भगत ,प्रधान सचिव,गौतम पाटील ,अविनाश सुखदेवे ,मंगला गाणार ,वसंत मोहिले ,माही मोहीले,चित्तरंजन चौरे ,देवानंद बडगे ,विजय सुरवाडे नरेश महाजन ,चंदा मोटघरे ,शारदा मोटघरे , रवी सहारे , शोभा गौतम पाटील , इंदू उमरे महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, जिल्हा नागपूर आणि इतर १००-१५० च्या उपस्थितीत कार्यक्रम यशस्वी पार पडला.प्रा. पुष्पा घोडके यांनी कार्यक्रमाचे सुंदर नियोजन आयोजन आणि सुरेख संचालन केले.

**राष्ट्रमाता जिजाऊ यांची ४२८ वी जयंती साजरी**

१२ जानेवारी रोजी दुपारी पांजरी पार उमरेड-भिवापूर रोड येथील मंगला गाणार यांच्या फार्म हाऊसवर वर राष्ट्रमाता जिजाऊ यांची ४२८ वी जयंती साजरी करण्यात आली. मान्यावराचे समयोचित भाषण झाल्यानंतर शोभा गौतम पाटील यांनी जिजाऊ यांच्या जयंतीनिमित्त एकपात्री प्रयोग नाट्य प्रस्तुत केले.

रामभाऊ डोंगरे, विजया श्रीखंडे, विजया ठाकरे, इंदू उमरे, देवयानी भगत, शशिकांत बनकर, शोभा बनकर, सुषमा शेवडे, सुमेर शेवडे, रमेश लोखंडे, गौतम पाटील, मंगला गाणार, निशा मेश्राम , देवेंद्र लांजेवार आणि जवळपास ५०-७५ कार्यकर्ते उपस्थित होते.

डॉ सुनिल भगत, देवयानी भगत, मंगला गाणार यांनी संचालन, व्यवस्थापन पाहिले.

**डॉ सुनिल भगतप्रधान सचिव,महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती,नागपूर.**

# सामन्याच्या दिवशी वाहतूक कोंडीचा त्रास टाळण्यासाठी पोलिस विभागाचे विशेष नियोजन -पोलिस उपायुक्त लोहित मतानी

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी राहुल मडावी नागपूर :** भारत आणि न्यूझीलंडमधील पहिला टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामना २१ जानेवारी रोजी नागपुरात जामठा येथील व्हिसीएच्या स्टेडिअमवर होणार आहे. यामुळे या परिसरात व वर्धा मार्गावर वाहतुकीची कोंडी होऊ नये, यासाठी नागपूर शहर पोलिस वाहतूक शाखेने वाहनांचे मार्ग व पार्किंगच्या जागा निश्चित केल्या आहेत. सामन्यासाठी येणाऱ्या क्रिकेट रसिकांनी या नियोजित मार्गांनी वाहने आणावी व नमूद केलेल्या पार्किंगच्या जागांवरच आपली वाहने पार्क करावी, असे आवाहन वाहतूक शाखेचे पोलिस उपायुक्त लोहित मतानी यांनी केले आहे. वाहतुकीची कोंडी टाळण्यासाठी क्रिकेट रसिकांनी शक्यतोवर मेट्रोचा वापर करावा, असेही आवाहन त्यांनी केले आहे.

सर्वसामान्यांना वाहतूक कोंडीचा त्रास होऊ नये, यासाठी पोलिसांनी विशेष नियोजन केले आहे. या नियोजनात वाहनांनी येण्याचे व बाहेर पडण्याचे मार्गही निश्चित करण्यात आले आहेत. याशिवाय, दुचाकी व चारचाकी वाहने, स्कूल बस, व्हीआयपी, पोलिस व प्रसार माध्यमांचे प्रतिनिधी यांच्यासाठी पार्किंगच्या वेगवेगळया व्यवस्था करण्यात आल्या आहेत. पोलिस उपायुक्त लोहित मतानी यांनी दिलेल्या माहितीनुसार, नागपुरातून जामठा येथे सामन्यासाठी येणारी वाहने वर्धा मार्गावरून नॅशनल कॅन्सर इन्स्टिट्यूटच्या मार्गाने जाणाऱ्या डाव्या बाजुच्या रस्त्याने न्यायची आहेत. एनसीआयच्या मार्गावर पुढे गेल्यावर तेथून माऊली नगरीजवळ डावे वळण घेऊन चारचाकी व दुचाकी वाहनांसाठी निश्चित करण्यात आलेल्या पार्किंगच्या जागांकडेच आपली वाहने न्यायची आहेत, असे पोलिस उपायुक्त मतानी यांनी स्पष्ट केले आहे.



**अशी आहे पार्किंग व्यवस्था**

दुचाकी व चारचाकी वाहनांच्या पार्किंगसाठी वेगवेगळ्या व्यवस्था आहेत. पार्किंग कक्ष 'ए' या ठिकाणी फक्त व्हिआयपी, पोलिस आणि प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधींसाठीच वाहनांचे पर्किंग उपलब्ध राहणार आहे. त्यानंतर कक्ष-बी येथे चार चाकी, कक्ष-सी (अन्विता फार्म) येथे दुचाकी वाहने, कक्ष डी-१ येथे एका बाजुला चार चाकी तर दुसऱ्या बाजुला दुचाकी पार्किंग, कक्ष डी-२, डी-३, डी-४, डी-५, इ-(अल्ट्राटेक) येथे चार चाकी वाहनांचे पार्किंग उपलब्ध राहील. कक्ष-जी येथे फक्त मेंबर्स पार्किंग राहणार आहे, तर कक्ष-एच येथे केवळ स्कूल बसचे पार्किंग राहील. कक्ष-आय हा राखीव पार्किंगसाठी ठेवण्यात आला आहे.

जामठा टी पाईंटवरून स्टेडियम व जामठा गावाकडे कोणत्याही वाहनांना हा मार्ग वापरता येणार नाही, असे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

**वर्धा मार्गे येणाऱ्या वाहतुकीसाठी निवडा हे मार्ग**

वर्धा, बुटीबोरी मार्गाने जामठ्याकडे येणाऱ्या वाहनांसाठी कक्ष-एफ (ब्रह्मकुमारी) निश्चित करण्यात आला आहे. येथे एका बाजुला दुचाकी तर दुसऱ्या बाजुला चार चाकी वाहनांचे पार्किंग उपलब्ध आहे. तेथून स्टेडिअमसाठी फिडर बसची व्यवस्था उपलब्ध राहणार आहे. जामठा टी पॉईंटवरून कोणताही प्रवेश होणार नाही. या मार्गाने फक्त खेळाडू व अंम्पायर यांची वाहने नेण्याची मुभा राहणार आहे. त्याचप्रमाणे स्कूल बस वाहनांना एनसीआयच्या समोरून एक युटर्न घ्यावा लागणार असून पुढे गेट नंबर १३ समोर उपलब्ध पार्किंगच्या कक्षात वाहने पार्क करावी लागणार आहेत. व्हिसीएच्या सदस्यांची वाहने देखील याच पद्धतीने प्रवेश घेतील.

**वाहतूक कोंडी टाळण्यासाठी मेट्रोचाच वापर करण्याचे आवाहन**

जी वाहने जामठा टी पॉईंट क्रॉस करणार आहेत, त्यांच्यासाठी अल्ट्राटेकपुढील पार्किंग येथे चार चाकी पार्किंग उपलब्ध राहणार आहे. त्यांच्यासाठी फिडर बसची सोय आहे. दुचाकी व चारचाकी वाहनांच्या येण्याचे (एंट्री रूट) व बाहेर पडण्याचे (एक्झीट रूट) निश्चित करण्यात आले असून वाहनचालकांनी कोंडी टाळण्यासाठी त्यांचे पालन करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे वाहतूक कोंडी टाळण्यासाठी व आपला वेळ वाचविण्यासाठी क्रिकेट रसिकांनी शक्यतोवर मेट्रोचा वापर करावा, असे आवाहनही वाहतूक पोलिसांकडून करण्यात आले आहे. वाहनचालकांनी याबाबत अधिक स्पष्टीकरणासाठी वाहतूक पोलिसांकडून जारी करण्यात आलेल्या दिशादर्शक नकाशाचा वापर करावा, असेही सूचित करण्यात आले आहे.

**सामन्यापूर्वी व नंतर इतरांनी हा मार्ग टाळावा**

जामठा येथे क्रिकेट सामन्यासाठी येणार नसलेल्या पण या मार्गाचे जाण्यास इच्छूक वाहनचालकांनी २१ जानेवारी रोजी सामन्यापूर्वी सायंकाळी ५ ते ७ दरम्यान तसेच रात्री सामना संपल्यावर रात्री १० ते ११.३० दरम्यान हा मार्ग शक्यतोवर टाळावा, असे आवाहन वाहतूक पोलिस उपायुक्त मतानी यांनी केले आहे.



**माजी सरकारी वकील एडवोकेट मनोज म्हात्रे यांचे सुपुत्र डॉ.शिवम मनोज म्हात्रे हा बीएएमएस (BAMS) वैद्यकीय पदवी परीक्षेत उत्तीर्ण झाल्याबद्दल लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर यांनी अभिनंदन केले,याप्रसंगी पनवेल टाइम्सचे संपादक गणेश कोळी,ज्येष्ठ साहित्यिक प्रा.चंद्रकांत मढवी,एडवोकेट मिलिंद सुर्यवंशी उपस्थित होते.**

**( दैनिक युवक आधार)**

# नूतन नगरसेवक सतीश उर्फ गल्ला भाऊ वानखडे विकासकामांतून दाखवणार आपली छाप; जनतेच्या विश्वासावर निवड; वार्डाच्या सर्वांगीण विकासाचा निर्धार

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे /वाशीम जिल्हा प्रतिनिधी :** वाशीम नगरपरिषद निवडणुकीत जनतेचा भरघोस विश्वास संपादन करत सतिष उर्फ गल्ला भाऊ वानखडे यांनी त्यांनी आपल्या कार्यकाळाची सुरुवातच विकासाभिमुख दृष्टिकोनाने करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. "वचनांपेक्षा कृतीतून विकास दिसला पाहिजे," ही भूमिका त्यांनी स्पष्ट केली आहे.

सर्वसामान्य नागरिकांशी थेट संपर्क, समस्यांची प्रत्यक्ष पाहणी आणि त्या तातडीने सोडवण्याची तत्परता ही सतिष उर्फ गल्ला भाऊ वानखडे यांची कार्यशैली मानली जाते. निवडणूक प्रचारादरम्यान त्यांनी रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, गटार व्यवस्था, पथदिवे, आरोग्य व शिक्षण यासारख्या मूलभूत सुविधांवर भर देण्याचे आश्वासन दिले होते. आता त्या आश्वासनांची पूर्तता विकासकामांतून दाखवणार, असा विश्वास नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे.

वार्डातील युवक, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी उपयुक्त योजना राबवणे, नागरिकांच्या तक्रारींसाठी सुलभ संपर्क व्यवस्था निर्माण करणे, तसेच नगरपरिषद व प्रशासनाशी समन्वय साधून निधी उपलब्ध करून घेणे, यावर त्यांचा विशेष भर राहणार आहे. "नगरसेवक हे पद सत्तेचे नाही, तर सेवेचे आहे," असे ते नेहमी सांगतात.

निवडीनंतर बोलताना गल्ला भाऊ वानखडे म्हणाले,"हा विजय माझा वैयक्तिक नसून माझ्यावर विश्वास टाकणाऱ्या प्रत्येक मतदाराचा आहे.



माझ्या वार्डाचा सर्वांगीण विकास करणे, प्रत्येक घटकाला न्याय देणे आणि पारदर्शक पद्धतीने काम करणे, हेच माझे ध्येय आहे."

त्यांच्या निवडीमुळे वार्डात सकारात्मक वातावरण निर्माण झाले असून, विकासकामांना नवी दिशा मिळेल, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करत आहेत. नूतन नगरसेवक म्हणून सतीष उर्फ गल्ला भाऊ वानखडे आपल्या कार्यातून वेगळी छाप पाडतील, असा विश्वास स्थानिक पातळीवरून व्यक्त होत आहे.

# महाराष्ट्र राज्य वीज तांत्रिक कामगार संघटनेचे केंद्रीय पदाधिकारी यांची पाटोदा येथे भेट

## पाटोदा उपविभागाची नवनिर्वाचित कार्यकारणीची घोषणा

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी) :** महाराष्ट्र राज्य वीज तांत्रिक कामगार संघटनेचे केंद्रीय पदाधिकारी यांनी पाटोदा येथे सदिच्छा भेट दिली. दिनांक-१९/०१/२०२६ रोजी महाराष्ट्र राज्य वीज तांत्रिक कामगार संघटनेचे केंद्रीय पदाधिकारी यांनी महाड अधिवेशन तयारी निमित्त पाटोदा येथे धावती भेट दिली. या वेळी संघटनेचे केंद्रीय अध्यक्ष श्री.भाऊसाहेब भाकरे, सरचिटणीस श्री. सय्यद झहीरुद्दीन, श्री.कोल्हे मामा, श्री.थोरात साहेब यांची उपस्थिती होती. या वेळी



उपस्थित मान्यवरांचा पाटोदा उपविभागातील कर्मचाऱ्यांनी सत्कार केला. त्या नंतर पाटोदा उपविभागाची नवनिर्वाचित कार्यकारणीची घोषणा केंद्रीय पदाधिकाऱ्यांनी केली. या मध्ये पाटोदा उपविभागीय अध्यक्ष श्री.विठ्ठल आण्णासाहेब भाकरे, उपाध्यक्ष श्री.सय्यद सद्दाम मुसा, सचिव श्री. गणेश शिवाजी दळवी, संघटन सचिव श्री.अनपट संदिपान छगन, कोषाध्यक्ष श्री.शहाजी परमेश्वर नाईकवाडे यांची निवड करण्यात आली. तसेच लातूर परिमंडळ कार्यकारणीवर श्री. सतीश सोमीनाथ गोरे यांची निवड करण्यात आली.या वेळी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा केंद्रीय पदाधिकाऱ्यांनी सत्कार केला. त्या नंतर संघटनेचे केंद्रीय अध्यक्ष श्री.भाऊसाहेब भाकरे यांनी रि स्ट्रेचिंग बाबत आपले मनोगत व्यक्त केले. तसेच संघटनेचे सरचिटणीस सय्यद जहीरोद्दीन साहेब यांनी कंपनीच्या कामकाजाबाबत आपले मनोगत व्यक्त केले. या प्रसंगी पाटोदा उपविभागातील संघटनेचे सभासद बहुसंख्येने उपस्थित होते.

# कु.प्रांजल जगदीश शिंदेंची राष्ट्रीय कराटे दिल्लीतील स्पर्धेसाठी निवड

**दैनिक युवक आधार**

**सणसर/विकास क्षत्रिय :** इंदापूर तालुक्यातील सणसर गावचे सागर मनोहर निंबाळकर यांची सातारा येथील भाची कु प्रांजल शिंदे हिने चूल आणि मूल याच्या पलीकडे जाऊन क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या विचाराने आता मुली राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर गुणवत्ता सिद्ध करत आहेत. सातारा जिल्ह्यातील खेड न्यू विकासनगर गावातील कु. प्रांजल जगदीश शिंदे हिची नवी दिल्ली येथे होणाऱ्या राष्ट्रीय कराटे स्पर्धेत निवड झाली आहे.या निवडीबद्दल संपूर्ण सातारा जिल्ह्यामधील क्रीडा क्षेत्राशी निगडित अनेक मान्यवरांनी अभिनंदन केले आहे.

सातारा शहरात नजीकच्या न्यू विकासनगर,खेड येथील कुमारी प्रांजल जगदीश शिंदे हिला लहानपणापासून कराटे या खेळाची आवड होती. तिचे पालक व सामाजिक कार्यकर्ते जगदीश शिंदे यांच्या प्रोत्साहानाने तिने शालेय क्रीडा स्पर्धेत चमकदार कामगिरी केली.त्यानंतर राज्यस्तरीय वसई या ठिकाणी झालेल्या कराटे स्पर्धेमध्ये तिने सुवर्णपदक प्राप्त केले. कु प्रांजल शिंदेचे उपस्थित सर्वांनीच मनापासून कौतुक करून राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय स्पर्धेमध्ये या प्रांजलला संधी




मिळाल्यास भारताला कराटे स्पर्धेत सुवर्णपदक मिळवून देईल.असे समजून अनेकांनी शुभेच्छा दिल्या.पश्चिम महाराष्ट्र रिपब्लिकन सेनेचे अध्यक्ष श्री रमेश उबाळे यांनी कौतुकाची थाप देऊन आपल्या भारताला कुस्तीमध्ये पहिले कास्य पदक मिळवून देणारे महान कुस्तीगीर खाशाबा जाधव यांच्या सातारा जिल्ह्यात आता कराटे स्पर्धेमधून कु. प्रांजल शिंदे हीने सुद्धा आपल्या कराटे स्पर्धेत ठसा उमटवला आहे.

भविष्यात या प्रकारच्या कराटे खेळातील क्षेत्राला संधी मिळाल्यास ऑलिंपिक स्पर्धेतही निश्चितच यश मिळेल असं मत व्यक्त करण्यात आले नवी दिल्ली येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय कराटे स्पर्धेसाठी कु. प्रांजल शिंदे ही अथक परिश्रम व सराव करत आहे.तिच्या या निवडीमुळे जिल्यातून अनेक मान्यवर कौतुक करून मार्गदर्शन करत आहेत.

# अलिबाग तालुक्यात 'शेकाप' ठरणार किंगमेकर!

**दैनिक युवक आधार**

**निलेश फुंडे/ अलिबाग रेवदंडा प्रतिनिधी :** अलिबाग तालुक्यात आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय वातावरण तापू लागले असताना, शेतकरी कामगार पक्षाची (शेकाप) मते निर्णायक ठरणार असल्याची जोरदार चर्चा राजकीय विश्लेषकांमध्ये सुरू झाली आहे.तालुक्यात कोणत्याही पक्षाला एकहाती सत्ता मिळवणे अवघड असताना, शेकापचा कौल ज्या बाजूला, त्या बाजूला सत्ता अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. विरोधी पक्षांकडून कितीही वल्गना, आरोप-प्रत्यारोप केले जात असले तरी शेकापने ठरवले तर उमेदवार निवडूनही आणू शकतात आणि पाडूही शकतात, हे वास्तव नाकारता येणार नाही.

अलिबाग तालुक्यात शेकापची पारंपरिक मतपेढी आजही मजबूत असून ग्रामीण भागातील शेतकरी, कामगार, कष्टकरी वर्गात पक्षाची पकड कायम आहे. त्यामुळेच सत्ताधारी असोत वा विरोधक, सर्वच पक्षांचे लक्ष शेकापकडे लागले आहे. पडद्यामागे जोरदार हालचाली सुरू असून समर्थन मिळवण्यासाठी गुप्त बैठका, राजकीय जुळवाजुळव रंगात आली आहे.

विशेष म्हणजे, शेकापची मते केवळ संख्येने नव्हे तर योग्य ठिकाणी पडल्यास निवडणुकीचा पूर्ण निकाल बदलण्याची क्षमता ठेवतात. त्यामुळे



अनेक प्रस्थापित नेत्यांची धाकधूक वाढली असून काही जागांवर उमेदवार निश्चित करतानाही शेकापचा विचार डोळ्यासमोर ठेवावा लागत आहे.राजकीय विश्लेषकांच्या मते, "अलिबाग तालुक्यातील ही निवडणूक म्हणजे दोन मोठ्या आघाड्यांमधील लढत नसून, शेतकरी कामगार पक्ष कोणासोबत उभा राहतो, यावर सत्तेचा फैसला होणार आहे."आगामी काही दिवसांत शेकापची भूमिका स्पष्ट झाल्यास तालुक्यातील राजकारणात भूकंपसदृश घडामोडी घडण्याची शक्यता वर्तवली जात असून, या निवडणुकीत 'शेकाप फॅक्टर' सर्वात निर्णायक ठरणार हे मात्र आता स्पष्ट झाले आहे.

# राज्यस्तरीय स्वरचित कविता स्पर्धेत 'हरीश हातवटे' यांचा प्रथम क्रमांक - वाळुंज शाळेच्या यशाने वाढला आष्टीचा गौरव!

**दैनिक युवक आधार**

**ता. आष्टी अंभोरा बाळासाहेब रकटाटे :** शब्दांना भावना, विचारांना दिशा आणि कवितेला जिवंतपणा देणारे उत्कृष्ट कवी तसेच जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वाळुंज (ता. आष्टी) येथील पदवीधर शिक्षक श्री. हरीशजी हातवटे सर यांनी राज्यस्तरीय स्वरचित कविता सादरीकरण स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावून आष्टी तालुक्याचा गौरव वाढवला आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशामुळे वाळुंज शाळा परिसरात तसेच संपूर्ण तालुक्यात आनंदाचे वातावरण पसरले असून सर्व स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या वतीने जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, संगमनेर (जि. अहमदनगर) येथे राज्यस्तरीय स्वरचित काव्य सादरीकरण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून त्यामध्ये श्री. हरीशजी हातवटे सर यांनी प्रथम क्रमांकावर आपले नाव कोरले आहे.

या राज्यस्तरीय स्पर्धेत महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतून अनेक कवी, शिक्षक आणि साहित्यप्रेमी स्पर्धकांनी सहभाग नोंदवला होता. विविध विषयांवर आधारित कविता, त्यातील आशयाची खोली, प्रभावी मांडणी आणि आत्मविश्वासपूर्ण सादरीकरण यावर स्पर्धेचे मूल्यमापन करण्यात आले.

अशा दर्जेदार स्पर्धेत श्री. हरीशजी हातवटे सरांनी आपल्या स्वरचित कवितेचे प्रभावी सादरीकरण करून निर्णायक मंडळाचे तसेच उपस्थित श्रोत्यांचे लक्ष वेधून




घेतले. त्यांच्या कवितेमध्ये समाजभान, प्रेरणा, संस्कार, माणुसकी आणि सकारात्मक दृष्टिकोनाचा सुंदर संगम दिसून आला. त्यामुळे त्यांची कविता केवळ शब्दांचा खेळ न राहता ती थेट हृदयाला भिडणारी ठरली.


शिक्षक म्हणून विद्यार्थ्यांना शिकवताना त्यांनी नेहमीच अभ्यासासोबत वाचन, लेखन आणि सर्जनशीलतेला महत्त्व दिले आहे. विद्यार्थ्यांमध्येही भाषेची आवड निर्माण व्हावी, आत्मविश्वास वाढावा आणि आपल्या विचारांना सुंदर शब्दरूप देता यावे, यासाठी ते नेहमी प्रयत्नशील असतात. त्यांच्या याच सातत्यपूर्ण मेहनतीचे आणि साहित्यिक आवडीचे फलित म्हणजे आजचे हे राज्यस्तरीय यश होय.

शिक्षक हा समाजाचा आधारस्तंभ असतो. शिक्षणासोबत कला, साहित्य, संस्कृती यांचे संवर्धन करणारे शिक्षक हे समाजाला नवी दिशा देतात. श्री. हरीशजी हातवटे सर यांच्या या कामगिरीमुळे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वाळुंज आणि आष्टी तालुक्याची ओळख राज्यस्तरावर अधिक दृढ झाली आहे.

या गौरवास्पद यशाबद्दल शाळेतील शिक्षकवृंद, मुख्याध्यापक, विद्यार्थी, पालकवर्ग, ग्रामस्थ तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांनी श्री. हरीशजी हातवटे सरांचे मनःपूर्वक अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.राज्यस्तरीय स्वरचित कविता स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावल्याबद्दल श्री. हरीशजी हातवटे सर यांचे हार्दिक अभिनंदन व पुढील साहित्यिक प्रवासासाठी मनःपूर्वक शुभेच्छा

# बौद्धिक संपदा अधिकार,पेटंट आणि डिझाईन या विषयावर ऑनलाइन राष्ट्रीय कार्यशाळा संपन्न




**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी)** - जय भवानी महाविद्यालय पाटोदा आणि बलभीम महाविद्यालय बीड येथील अर्थशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने बौद्धिक संपदा अधिकार, पेटंट आणि डिझाईन फायलिंग या विषयावर एक दिवसीय ऑनलाईन राष्ट्रीय कार्यशाळा संपन्न झाली.या कार्यशाळेचा उद्देश बौद्धिक संपदा हक्कांबाबत जनजागृती करणे हा होता. या कार्यशाळेमध्ये राजीव गांधी राष्ट्रीय बौद्धिक संपदा अधिकार व्यवस्थापन संस्था नागपूर येथील सहाय्यक संचालक श्री.कुमार राजू यांनी मार्गदर्शन केले. या कार्यशाळेमध्ये त्यांनी IPR, पेटंट, औद्योगिक रचना (Industrial Designs), ट्रेडमार्क, भौगोलिक संकेतांक (Geographical Indication) आणि कॉपीराइट या विषयावर सखोल मार्गदर्शन केले. त्यांनी कायदेशीर बाबी सोप्या भाषेत मांडल्या. या कार्यशाळेचे अध्यक्ष बलभीम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.संतोष उंदरे सर हे होते. या कार्यशाळेमध्ये प्राचार्य डॉ. विश्वास कदम सर, प्राचार्य डॉ.सदाशिव सरकटे सर, उपप्राचार्य डॉ.बाबासाहेब कोकाटे सर, आक्यूएसी समन्वयक प्रा.विनोद किर्दक यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यशाळेचे सूत्रसंचलन आक्यूएसी समन्वयक डॉ.अनिल चिंधे यांनी केले. प्रास्ताविक प्रा.डॉ.सोमेश्वर बाबर यांनी केले.पाहुण्याचा परिचय डॉ. गोवर्धन वायसे यांनी करून दिला. या कार्यक्रमाचे आभार प्रा.डॉ.शिवाजी काकडे यांनी मानले. या कार्यशाळेमध्ये मोठ्या संख्येने विद्यार्थी, संशोधक व प्राध्यापकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. प्रश्नोत्तर सत्रामुळे सहभागींच्या शंका निरसनास मदत झाली. आशा पध्दतीने ही कार्यशाळा नवकल्पना व संशोधनाला चालना देणारी ठरली.

# शासन चाललं मैदानात! आमदार लवटे गाडीतून उतरले आणि अन्यायावर घातला ब्रेक

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी सौरव डांगरकर/ अमरावती दर्यापूर** – अमरावती जिल्ह्यातील दर्यापूर विधानसभा क्षेत्राचे आमदार माननीय श्री. गजानन लवटे साहेब यांनी पुन्हा एकदा आपली लोकाभिमुख आणि तत्पर नेतृत्वशैली दाखवून दिली आहे. दैनिक युवक आधारच्या विदर्भ संपादिका ज्योत्स्ना करवाडे यांच्या ठाम पाठपुराव्यामुळे एका सामान्य नागरिकाला न्याय मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

दर्यापूर तालुक्यातील श्री. ज्ञानेश्वरराव काळे यांना त्यांच्या घराशेजारील व्यक्तीकडून सातत्याने त्रास दिला जात होता. यासंदर्भात त्यांनी दोन वेळा ग्रामपंचायत व ग्रामसचिवाकडे तक्रार केली होती. मात्र सरपंच व सचिवांनी या तक्रारीकडे दुर्लक्ष करत उडवा–उडवीची उत्तरे दिली. त्यामुळे अन्यायाने त्रस्त झालेल्या काळे यांनी दैनिक युवक आधारच्या विदर्भ संपादिका ज्योत्स्ना करवाडे मॅडम यांच्याशी संपर्क साधला.

ज्योत्स्ना करवाडे यांनी केवळ बातमीपुरती भूमिका न ठेवता, प्रत्यक्ष



ग्रामसचिवांना समज देत "गावातील शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी हा प्रश्न तातडीने सोडवावा" असा ठाम सल्ला दिला. तरीही स्थानिक प्रशासनाकडून योग्य प्रतिसाद मिळाला नाही.

दिनांक १९ जानेवारी २०२६ रोजी ज्योत्स्ना करवाडे यांनी हा विषय थेट आमदार माननीय गजानन लवटे साहेबांसमोर मांडला. जरी आमदार साहेब आपल्या नियोजित कार्यक्रमात व्यस्त असले तरी त्यांनी गाडी थांबवून खाली उतरून, कोणतीही घाई न करता संपूर्ण प्रकरण शांतपणे ऐकून घेतले. त्यांनी श्री. ज्ञानेश्वर काळे यांची प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांची आपबीती समजून घेतली.

त्यानंतर आमदार साहेबांनी तात्काळ ग्रामसचिवाला फोन करून तक्रारीची दखल घेतल्याचा पुरावा मागितला आणि संबंधितांना योग्य कारवाईचे स्पष्ट निर्देश दिले. या तात्काळ हस्तक्षेपामुळे काळे यांना दिलासा मिळाला असून गावात शांतता प्रस्थापित होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

ही घटना म्हणजे दैनिक युवक आधारच्या निर्भय, लोकहितवादी पत्रकारितेचा जिवंत पुरावा आहे. सामान्य नागरिकाच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणारी ही पत्रकारिता आणि आमदार साहेबांची तत्परता — या दोघांच्या समन्वयातूनच जनतेला न्याय मिळतो, हे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे.

> " श्री.ज्ञानेश्वरराव काळे अन्यायाविरोधात हार न मानणारा सामान्य नागरिक. योग्य व्यासपीठ आणि योग्य नेतृत्व मिळाल्यास न्याय मिळतो, याचं जिवंत उदाहरण.

> " ज्योत्स्ना करवाडे (विदर्भ संपादिका – दैनिक युवक आधार) निर्भय, ठाम आणि जनतेसाठी लढणारी पत्रकारिता. सामान्य माणसाच्या पाठीशी उभं राहून अन्यायाविरुद्ध आवाज उठवणारी ताकद.

> " आमदार गजानन लवटे साहेब लोकाभिमुख, तत्पर आणि थेट मैदानात उतरून प्रश्न सोडवणारे नेतृत्व. सामान्य नागरिकाची तक्रार असो वा प्रशासनाचा हलगर्जीपणा — आमदार लवटे साहेब तात्काळ दखल घेणारे आमदार म्हणून ओळखले जातात.

# म्हसावद येथील थेपडे विद्यालयात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा संपन्न

**दैनिक युवक आधार**

**जळगाव जिल्हा प्रतिनिधी/समाधान पाटील** : जळगाव तालुक्यातील म्हसावद येथे दि.१५जानेवारी २०२६ता जि जळगाव येथील स्वा. सै. पं. ध. थेपडे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात कै स्वा सै पंढरीनाथ धडुराम थेपडे संस्थेचे संस्थापक यांच्या 31 व्या स्मृती समारोह निमित्त इ. 10वी व 12वीतून प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच जिल्हास्तरावर तालुकास्तरावर विविध स्पर्धेत बक्षीस मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा देखील सत्कार



करण्यात आला. विचार मंचावर संस्थेचे अध्यक्ष व कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे श्री. डॉ. केदारजी थेपडे, संस्थेचे कोषाध्यक्ष श्री. बंकटभाऊ लढे तसेच म्हसावद नगरीतील वृत्तपत्र प्रतिनिधी समाधान पाटील, गावातील ज्येष्ठ श्रेष्ठ नागरिक व दापोरा येथील सामाजिक कार्यकर्ते नानाभाऊ सोनवणे, विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री.जी. डी. बच्छाव सर उपमुख्याध्यापक श्री एस के भंगाळे सर, पर्यवेक्षक श्री के पी पाटील सर हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेचे कोषाध्यक्ष श्री. बंकटभाऊ लढे हे होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेचे मुख्याध्यापक श्री जी. डी. बच्छाव सर यांनी केले. संस्थेचे अध्यक्ष श्री डॉक्टर केदारजी थेपडे सर यांनी आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्व सांगितले व मुलींसाठी खास शिक्षणाची सुविधा देणार असे सांगितले.सदर कार्यक्रमात पंधरा हजार रुपयांची रोख पारीतोषिकांचे वितरण यावेळी करण्यात आले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री एस जे पवार सर, शिक्षक प्रतिनिधी श्री. सचिन चव्हाण सर, पराग पाटील सर व श्री वाय पी चिंचोरे सर यांनी केले. आभार प्रदर्शन विद्यालयाचे पर्यवेक्षक श्री. के. पी. पाटील सर यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक शिक्षकेतर बंधू भगिनी यांचे सहकार्य लाभले.

# जिल्हा परिषद शाळा जनुना येथे नवीन शाळा व्यवस्थापन समिती स्थापन

## अध्यक्षपदी रमेश बुरकुले तर उपाध्यक्षपदी विजय कोल्हे यांची निवड

**दैनिक युवक आधार**

**उमरखेड तालुका प्रतिनिधी /राजु गायकवाड (मोहदरी) :** तालुक्यात शिक्षणक्षेत्रासी निगडीत असलेल्या पालक व्यवस्थापन समिती ची निवड दि १७ जानेवारी रोजी निवड पालकामधून करण्यात आली . अध्यक्षपदी रमेश सदाशिव बुरकुले, उपाध्यक्षपदी विजय प्रकाश कोल्हे तर सदस्यपदी विठ्ठल धुमाळे, वसंत चव्हाण , लक्ष्मण ठाकरे, गणेश जाधव ( शिक्षणतज्ञ ) सविता गजानन ढाकरे , पूण्यरथा पंजाब मेंढे , रेश्मा राठोड , सुनिता संतोष कलाने, राणी धोंगडे उषा पवार यांची शालेय व्यवस्थापन समिती पदी निवड करण्यात आली गावाचे तंटामुक्ती अध्यक्ष बळीराम चव्हाण ' माजी जि प. सदस्य देविदास खोकले कैलास




मोरे पो पा . सरपंच सुनिता बुरकुले सतिष राठोड शुभाष चव्हाण शंकर बुरकुले रमेश चव्हाण सुदाम धोंगडे सतिष ठाकरे यांनी नव निर्वाचीत समितीचे स्वागत केले तर समितीची निवड करण्यासाठी मुख्याध्यापक कृष्णा पाचकोरे दिनेश कोल्हे शेख इसाक शेख मुनीर सोपान मुरकुटे गजानन पूरी कुंडलिक गोरे गोपाल गिते लक्ष्मण वासुदेव यांनी परिश्रम घेतले पालक व गावकऱ्यांनी अभिनंदन केले.

# सर्व जातीय धर्मीयांचा फेब्रुवारीत पुनर्विवाह परिचय मेळावा

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी राकेश यादव वाडी नागपूर :** सर्व जाती आणि धर्मांमधील घटस्फोटीत तसेच विधवा- विधूर यांचे घर पुन्हा वसविण्याच्या हेतूने त्यांच्या पुनर्विवाह परिचय मेळावा घेण्याचा स्तुत्य उपक्रम महात्मा फुले शिक्षण संस्थेने हाती घेतला आहे. रेशीमबाग मधील संस्थेच्या सभागृहात 22 फेब्रुवारीला (रविवारी) होणाऱ्या या मेळाव्यासाठी 12 फरवरी पर्यंत नावे नोंदविणे आवश्यक आहे. असे संस्थेचे अध्यक्ष प्रा.अरुण पवार यांनी आज टिळक पत्रकार भवन येथे पत्रकार परिषदेमध्ये सांगितले.

नोंदणी फॉर्म संस्थेच्या कार्यालयात आणि mahatmafuless@gmail.com या ईमेलवर उपलब्ध राहतील. यासाठी ५०० रुपये शुल्क




आहे. नोंदणी झालेल्यांची परिचय पुस्तिका प्रसिद्ध केली जाईल. अधिक माहितीसाठी कार्याध्यक्ष प्रकाश देवते (9422809688 ) व अध्यक्ष अरुण पवार (9822697899) यांच्या मोबाईलवर संपर्क साधू शकता.

पत्रकार परिषदेला उपस्थित अध्यक्ष अरुण पवार, कार्याध्यक्ष प्रकाश देवते, गुलाब चिचाटे, रवींद्र अंबाडकर, रमेश राऊत, मुकेश घोळसे, राजेंद्र पाटील, अभिजीत पोतले, पंकज कुरळकर व देवराव प्रधान याची उपस्थिती होती.

# उबाठा शिवसेनेसह विविध पक्षांचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा भाजपात जाहीर प्रवेश

**दैनिक युवक आधार**

**सोयगाव तालुका प्रतिनिधी/ विजय काळे :** मा.केंद्रीय मंत्री खा. रावसाहेब दादा दानवे यांच्या प्रमुख उपस्थितीत सोयगाव तालुक्यात आज भव्य भाजपा प्रवेश सोहळा पार पडला. या सोहळ्यात उबाठा शिवसेनेसह विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी,आजी-माजी सरपंच,ग्रामपंचायत सदस्य, विविध कार्यकारी सोसायटीचे चेअरमन व संचालक तसेच सामाजिक क्षेत्रातील युवा नेतृत्वाने भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला.भाजपा राज्य कार्यकारिणी सदस्य सुरेशजी बनकर पाटील,

अल्पसंख्यांक प्रदेशाध्यक्ष ईद्रीसजी मुलतानी, भाजपा माजी नगरसेवक सुनील भाऊ मिरकर, VJNT प्रदेशाध्यक्ष सेल जयप्रकाश चव्हाण,माजी जिल्हा परिषद सदस्य शिवाजीराव बुडाळ, माजी सभापती उत्तम चव्हाण, सोयगाव तालुकाध्यक्ष संजय पाटील,युवा अध्यक्ष प्रदीप चव्हाण,माजी ढाबा उपसरपंच अण्णा पाटील,माजी सरपंच त्र्यंबक शिंगारे,आज्ञा सिंग राठोड,प्रमोद पाटील यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून असंख्य कार्यकर्त्यांनी भाजपात प्रवेश केला.

या प्रवेश सोहळ्यात उबाठा शिवसेनेचे तालुका सरचिटणीस गुलाबराव पाटील कोलते,शाखाप्रमुख एकनाथ सपाटे,माजी सरपंच मोहनसिंग



चव्हाण,शिवसेना युवा नेते करतारसिंग चव्हाण,वरखेडी खुर्द येथील विद्यमान सरपंच बळीरामजी जाधव,जामठी येथील माजी सरपंच सिताराम जाधव,उपसरपंच उत्तम राठोड,जामठी सोसायटी उपाध्यक्ष हेमराज राठोड, ग्रामपंचायत सदस्य विजय राठोड,श्रावण राठोड,बृहान तडवी,प्रदीप चव्हाण,शिवसेना शाखाप्रमुख ताराचंद जाधव, गुलाब चव्हाण तसेच फरदापुर गटातील असंख्य शिवसैनिक व कार्यकर्त्यांनी अल्पसंख्यांक प्रदेशाध्यक्ष ईद्रीसजी मुलतानी यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत भाजपात जाहीर प्रवेश केला.यावेळी मा.केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे यांनी प्रवेश केलेल्या सर्व कार्यकर्त्यांचे स्वागत करत केंद्र व राज्य सरकारच्या लोकाभिमुख योजनांची माहिती दिली.

भाजप हा विकास,विश्वास व सर्वसमावेशकतेचा पक्ष असून आगामी काळात सोयगाव तालुक्यात भाजप अधिक मजबूत होईल,असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

# चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र आता घरबसल्या मिळणार

**दैनिक युवक आधार**

**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम /गजानन पवार पाटील** : दि.२० जानेवारी (जिमाका) जिल्ह्यातील नागरिकांसाठी चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र मिळविण्याची सेवा आता पोलीस अधीक्षक कार्यालय, वाशिम यांच्या कार्यालयामार्फत पूर्णपणे ऑनलाईन करण्यात आली आहे. या सेवेमुळे प्रमाणपत्र घरबसल्या ऑनलाईन स्वरूपात मिळणार असून, यासाठी नागरिकांना पोलीस अधीक्षक कार्यालय, वाशिम येथे प्रत्यक्ष येण्याची आवश्यकता राहणार नाही.

याबाबत माहिती देताना पोलीस अधीक्षक, वाशिम अनुज तारे यांनी सांगितले की, या ऑनलाईन सेवेमुळे नागरिकांचा वेळ व खर्च वाचणार असून प्रक्रिया अधिक सुलभ, पारदर्शक व जलद होणार आहे.तसेच जिल्हा प्रकल्प प्रमुख (आपले सरकार) सौरभ जैन यांनी सांगितले की, नागरिकांनी चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्रासाठी जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय, वाशिम येथे प्रत्यक्ष येऊ नये. नागरिकांनी आपले सरकार पोर्टल किंवा नजीकच्या आपले सरकार सेवा केंद्र / सीएससी सेंटर मार्फत तसेच घरबसल्या ऑनलाईन अर्ज केल्यास, ठराविक कालावधीत चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र ऑनलाईन उपलब्ध करून देण्यात येईल.https://pcs.mahaonline.gov.in/Forms/Home.aspx या संकेतस्थळावर लॉगीन करून जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी या ऑनलाईन सेवेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# शासनाकडून व्यायाम शाळा निर्मिती व्हावी प्रतिकात्मक भिक मांगो आंदोलन

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे विदर्भ संपादक :** आज मंगळवार दि २० जानेवारी २०२६ रोजी मौजे दहिवड ता देवळा जि नाशिक येथील नवयुवकांचे शरीर सौष्ठव सक्षम सकस अबाधित राहणेसाठी जिम व्यायाम शाळा निर्माण व्हावी.

अनेक दिवसांपासूनची मागणी ग्रामपंचायत, शासकीय यंत्रणा, लोकप्रतिनिधी बेदखल असल्या कारणास्तव ग्रामविकास समिती दहिवड अध्यक्ष श्री संजय दहिवडकर यांनी दहिवड गावापासून धोबीघाट थेट शासकीय प्रशासकीय कार्यालय देवळा व शहरात प्रतिकात्मक भिक मागून आंदोलन छेडले मिळालेली ८०२ रूपये भिक शासनापर्यंत पोहोच करण्यासाठी चांदवड देवळा मतदार संघाचे आमदार डॉ राहूल दादा आहेर यांच्या दौलत निवासस्थानी पोहोच केली.

याकामी सहकार्य रामनगर येथील नवयुवक प्रविण सुदाम अहिरराव पत्रकार युवराज रमेश देवरे यांनी मोलाचे योगदान मदत कार्य केले.

# गळफास घेऊन तरुणीची हत्या

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर) :** कोणत्या तरी अज्ञात कारणाने एका २५ वर्षीय तरुणीने फॅनला ओढणीच्या साहयाने गळफास घेवुन आत्महत्या केल्याची घटना पनवेल शहरात घडली आहे.कांचन कश्यप असे मयत तरुणीचे नाव असून तिने करंजाडे येथील तिच्या राहते घरामध्ये कोणत्या तरी अज्ञात कारणाने फॅनला ओढणीच्या साहयाने गळफास घेवुन आत्महत्या केली.

या घटनेची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# कुणबी सेवा संस्था काटोल यांच्यावतीने नवनिर्वाचित लोकप्रतिनिधींचा सत्कार"

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी राकेश यादव वाडी नागपूर :** कुणबी सेवा संस्था काटोल यांच्या वतीने नुकत्याच झालेल्या नगरपालिका व नगरपंचायत निवडणुकांमध्ये नवनिर्वाचित काटोल, नरखेड, मोवाड व कोंढाळी येथील अध्यक्ष व सदस्यांचा सत्कार सोहळा महात्मा ज्योतिबा फुले सभागृह, काटोल येथे उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाची सुरुवात राजमाता जिजाऊ व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस माल्यार्पण व दीपप्रज्वलनाने झाली. शिवरायांवरील गीतगायन सौ. रेखाताई मोहोड




यांनी सादर केले.संस्थेचे अध्यक्ष श्री रमेजी फिस्के पाटील यांनी नवनिर्वाचित लोकप्रतिनिधींना समाजाचे ऋण प्रामाणिक सेवेतून फेडण्याचे आवाहन केले. प्रमुख वक्ते संभाजी ब्रिगेडचे प्रांतीय अध्यक्ष श्री सुधांशु मोहोड यांनी कुणबी समाजाची स्थिती व समृद्धीच्या पाऊलखुणांवर मार्गदर्शन केले.कार्यक्रमाच्या शेवटी नवनिर्वाचित लोकप्रतिनिधींचा शाल, श्रीफळ व मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. प्रशांतजी अर्डक यांनी केले, तर राऊत सर यांनी आभार मानले.

# निवडणुकांच्या रणधुमाळीत महेंद्रशेठ घरत यांचे कार्यकर्त्यांना बळ!

## उरण, खालापूर येथे महेंद्रशेठ घरत अर्ज भरण्यासाठी जातीने हजर

**दैनिक युवक आधार**

**उलवे, वार्ताहर :** महेंद्रशेठ घरत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या रणधुमाळीत कार्यकर्त्यांच्या आणि महाविकास आघाडीच्या उमेदवारांच्या मागे खंबीरपणे उभे आहेत.

जासई येथे हुतात्म्यांना आणि लोकनेते दि. बा. पाटील यांना आंतरराष्ट्रीय कामगार नेते, कॉंग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत आणि महाविकास आघाडीच्या उमेदवारांनी मंगळवारी सकाळी अभिवादन केले. त्यानंतरच उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी प्रयान केले.

मंगळवारी (ता. २०) खालापूर तालुक्यातील रिस गणातून पंचायत समिती उमेदवार निखिल ढवळे यांचा, तर जासई जिल्हा परिषद मतदारसंघाचे उमेदवार डॉ. मनीष पाटील, चिरनेरमधून अॅड. अविनाश ठाकूर यांचे उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी कॉंग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत जातीने हजर होते.यावेळी महेंद्रशेठ घरत म्हणाले, "महाविकास आघाडीचे उमेदवार



बहुमतांनी निवडून येतील. कारण दिबांचे नाव विमानतळाला अद्यापही दिलेले नाही, जेएनपीटी प्रकल्पग्रस्तांना अद्यापही साडेबारा टक्के विकसित भूखंड मिळाले नाहीत. त्यामुळे जनतेत रोष आहे. उरण नगरपरिषद निवडणुकीत चमत्कार झाला तसाच जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीत होईल. त्यामुळे कार्यकर्त्यांनी प्रचाराचे काम प्रामाणिकपणे करावे, मी आपल्या मागे खंबीरपणे उभा आहे." यावेळी मुरलीधर ठाकूर, अंगद ठाकूर, आनंद ठाकूर आणि कॉंग्रेसचे शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.

# तळा ज्युनियर कॉलेजमध्ये बारावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**तळा वार्ताहर :** तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे कला-वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय, तळा येथे इयत्ता बारावी (२०२५–२६) च्या विद्यार्थ्यांचा आशीर्वाद प्रदान समारंभ २० जानेवारी २०२६ रोजी मोठ्या उत्साहात पार पडला. याप्रसंगी संस्थेचे विश्वस्त श्री मारुती शिर्के गुरुजी, अध्यक्ष श्री मंगेश देशमुख, उपाध्यक्ष श्री पुरुषोत्तम मुळे, सचिव श्री महेंद्रशेठ कजबजे, कार्यकारी मंडळाचे सदस्य डॉ. सतीश वडके, श्री महादेव बैकर, श्री बी. के. पटेल, प्राचार्य श्री दिलीप ढाकणे, डॉ. दत्ता कुंटेवाड, तसेच कनिष्ठ



महाविद्यालयाचे शिक्षक उपस्थित होते.

यावेळी अनुप साळुंखे, ईशा पांचाळ, वैष्णवी खुटीकर, आरिफा गोठेकर, रोशनी अंबार्ले, अमृता दौडमणी व सानिया दुरे या विद्यार्थ्यांनी आपल्या भावना व्यक्त करत कॉलेजमधील आठवणींना उजाळा दिला. शिक्षक प्रतिनिधी म्हणून प्रा. पाटील एन सी, प्रा. वाडीकर के जे व प्रा. गायकवाड पी एम यांनी शिक्षणाचे महत्त्व सांगून विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. तसेच डॉ दत्ता कुंटेवाड यांनी १२ वी नंतर आपल्याच संस्थेच्या वरिष्ठ महाविद्यालयात प्रवेश घ्यावा असे आवाहन केले. संस्थेचे अध्यक्ष श्री मंगेश देशमुख यांनी संस्थेने उपलब्ध करून दिलेल्या शैक्षणिक सुविधांचा विद्यार्थ्यांनी योग्य उपयोग करून यश संपादन करावे, असे आवाहन केले. उपाध्यक्ष श्री पुरुषोत्तम मुळे यांनी बारावीनंतर विविध क्षेत्रातील करिअरच्या संधींची माहिती दिली. सचिव श्री महेंद्रशेठ कजबजे यांनी शिस्त, कष्ट व मूल्याधारित शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले. शिर्के गुरुजी यांनी कनिष्ठ महाविद्यालयाचा सलग पाच वेळा बोर्ड परीक्षेचा निकाल प्रथम क्रमांकानी लागल्याचा अभिमान व्यक्त करीत शुभेच्छा दिल्या. महादेव बैकर यांनी विद्यार्थ्यांनी बोर्ड परीक्षेला न घाबरता सामोरे जावे असे प्रतिपादन केले. प्राचार्य श्री दिलीप ढाकणे यांनी या संस्थेत शिक्षण घेऊन एक आदर्श नागरिक म्हणून जीवन जगण्याचा प्रयत्न करावा असे सांगितले. दरम्यान तळाचे वाहतूक नियंत्रक श्री प्रशांत मांदुस्कर यांनी विद्यार्थ्यांना बसची उत्कृष्ट सेवा दिल्याबद्दल संस्थेच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे निवेदन प्रा. सर्जे व्ही. बी. तर आभार प्रा. जमादार एस. टी. यांनी केले. संपूर्ण समारंभ प्रेरणादायी वातावरणात आणि भावनिक क्षणांनी भरलेला ठरला. यावेळी संस्थेचे पदाधिकारी कनिष्ठ महाविद्यालयाचे सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# उद्योगसंस्कृती आणि रोजगारनिर्मितीला गती देत बॅंकानी प्रलंबित सर्व प्रकरणे तात्काळ निकाली काढावे - जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर

## शासन पूरस्कृत योजनांच्या अंमलबजावणीचा जिल्हास्तरीय आढावा

**दैनिक युवक आधार**

**उपसंपादक महाराष्ट्र राजु शिंदे :** दि.२० जानेवारी (जिमाका) मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम (सीएमईजीपी)सह विविध शासन पूरस्कृत योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीतून जिल्ह्यात उद्योगसंस्कृती विकसित करावी आणि स्थानिक पातळीवर मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मितीला चालना देण्यासाठी प्रलंबित सर्व प्रकरणे तात्काळ निकाली काढा असे निर्देश जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी दिले.त्यांच्या अध्यक्षतेखाली शासन पूरस्कृत योजनांचा जिल्हास्तरीय आढावा घेण्यात आला.

सीएमईजीपी, पीएमईजीपी आणि पीएमएफएमई या योजनांच्या माध्यमातून सुशिक्षित बेरोजगार युवक, महिला, अनुसूचित जाती-जमाती, अल्पसंख्याक व नवउद्योजकांना स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यावर शासनाचा भर आहे. उत्पादन, सेवा व कृषीपूरक क्षेत्रात सूक्ष्म व लघु उद्योगांची स्थापना होऊन रोजगारनिर्मिती व्हावी, हा या योजनांचा मुख्य उद्देश आहे.

या बैठकीस अग्रणी बॅंक व्यवस्थापक यशवीर कुमार, जिल्हा उद्योग केंद्राच्या महाव्यवस्थापक पुनम घूले, कृषी उपसंचालक हिना शेख यांच्यासह विविध राष्ट्रीयीकृत, खासगी व सहकारी बॅंकांचे



प्रतिनिधी उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी यांनी बॅंकनिहाय उद्दिष्टे, प्राप्त प्रस्ताव, मंजूर प्रकरणे, मंजुरीची टक्केवारी तसेच प्रलंबित अर्जांचा सविस्तर आढावा घेत पुढील नियोजनाबाबत सूचना केल्या. सीएमईजीपी योजनेअंतर्गत जिल्ह्यासाठी एक हजार प्रकरणांचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले असून त्यापैकी २६२ कर्ज प्रकरणांना आतापर्यंत मंजुरी देण्यात आली आहे.शासन पूरस्कृत असलेल्या या तीनही योजनेत समाविष्ट असलेल्या सर्व बॅंकानी १०० टक्के उद्दिष्ट विहीत मुदतीत साध्य करावे. पीएमएफएमई योजनेअंतर्गत बॅंक ऑफ महाराष्ट्रनेही शंभर टक्के उद्दिष्ट साध्य केले आहे. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल जिल्हाधिकारी यांच्या हस्ते संबंधित बॅंकांना प्रशस्तिपत्र देऊन गौरविण्यात आले.

शासन पूरस्कृत योजना या केवळ कर्जपुरवठ्यापुरत्या मर्यादित नसून युवकांना आत्मनिर्भर बनविण्याचे प्रभावी माध्यम असल्याचे जिल्हाधिकारी यांनी स्पष्ट केले. लाभार्थ्यांना वेळेत कर्ज मंजुरी व वितरण झाल्यासच उद्योग सुरू होऊन प्रत्यक्ष रोजगारनिर्मिती होईल. त्यामुळे बॅंकांनी प्रस्ताव प्रलंबित न ठेवता तात्काळ निर्णय घ्यावेत आणि कमी कामगिरी करणाऱ्या बॅंकांनी गती वाढवून प्रलंबित प्रकरणे निकाली काढावीत, असे निर्देश त्यांनी दिले.या योजनांची प्रभावी अंमलबजावणी झाल्यास जिल्ह्यात उद्योगसंस्कृती बळकट होऊन रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होतील, असा विश्वास जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी व्यक्त केला.

# निर्धार विकासाचा... संकल्प विजयाचा..!

## शिवना सर्कलमध्ये ‘हक्काची ताई’ मैदानात

**दैनिक युवक आधार**

**उपसंपादक महाराष्ट्र -राजु शिंदे :** विकासाचा ठाम निर्धार, विजयाचा स्पष्ट संकल्प आणि जनतेशी थेट नातं जपणारा तरुण,सुशिक्षित चेहरा म्हणून कु. निकिता राजेंद्र काळे या शिवना सर्कलमधून शिवसेनेच्या अधिकृत उमेदवार म्हणून रिंगणात उतरल्या आहेत. “आपली हक्काची ताई” म्हणून ओळख निर्माण करणाऱ्या निकिता काळे या शिवना सर्कलमध्ये नव्या राजकीय ऊर्जेचं प्रतीक ठरत आहेत.लहानपणापासूनच घरातूनच राजकारण, समाजकारण आणि व्यावसायिक शिस्तीचे संस्कार मिळाल्याने नेतृत्वाची भक्कम पायाभरणी त्यांच्यात दिसून येते.कुटुंबातील राजकीय पार्श्वभूमी,वडिलांचे सामाजिक कार्यातील सातत्य,प्रतिष्ठित व्यापारी म्हणून असलेली ओळख आणि समाजासाठी २४ तास झटण्याची वृत्ती यामुळे जनतेचा विश्वास त्यांच्यावर अधिक दृढ होत आहे.यासोबतच सिल्लोड–सोयगावचे आमदार व माजी मंत्री अब्दुल सत्तार यांची भक्कम साथ लाभत असल्याने निकिता काळेंच्या उमेदवारीला राजकीय बळ मिळाले असून, विकासाभिमुख नेतृत्वाबाबत कोणतीही शंका उरत नाही,अशी भावना शिवना सर्कलमध्ये



व्यक्त होत आहे.सुशिक्षित, संयमी आणि विकासकेंद्रित दृष्टिकोन असलेल्या कु. निकिता राजेंद्र काळे या केवळ उमेदवार नसून, त्या शिवना सर्कलमधील बदलाची, विश्वासाची आणि भविष्यातील विकासाची आशा बनत चालल्या आहेत.शिवसेनेच्या संघटनात्मक ताकदीसह त्या जनतेच्या प्रश्नांसाठी ठामपणे उभ्या राहतील,असा विश्वास समर्थकांकडून व्यक्त केला जात आहे.

# नरनाळ्याच्या डोंगररांगेत संगीत, लोककला, ट्रेकिंग व स्थानिक खाद्यपदार्थांचा उत्सव !!

## नागरिक व पर्यटकांनी बहुसंख्येने सहभागी व्हावे: जिल्हाधिकारी वर्षा मीना

**दैनिक युवक आधार**

**दिलीप कराळे/अकोट तालुका प्रतिनिधी :** नरनाळा किल्ल्याच्या ऐतिहासिक व सांस्कृतिक वारशाचे जतन आणि पर्यटनवाढीस चालना देण्यासाठी दि. ३० जानेवारी ते १ फेब्रुवारी दरम्यान भव्य ‘नरनाळा महोत्सव’ आयोजित करण्यात येत आहे.

मॅराथॉन, जंगल सफारी, ट्रेकिंग, किल्ला सफर, चित्रकला व वन्यजीवन छायाचित्र स्पर्धा यांसह निसर्गानुभव देणारे विविध उपक्रम तिन्ही दिवस आयोजित केले जाणार आहेत.दररोज सायंकाळी ५ ते १० या वेळेत सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानी लाभणार असून, पहिला दिवस ३० जानेवारीला “चला हवा येऊ द्या” दुसरा दिवस – “शिवशंभो गर्जना” व रूपाली जग्गा यांचा लाईव्ह कॉन्सर्ट




,तिसरा दिवस – सुप्रसिद्ध गायक कैलास खेर यांचा लाईव्ह इन कॉन्सर्ट चेआयोजन करण्यात आले.नरनाळा महोत्सवाच्या माध्यमातून जिल्ह्याचा समृद्ध इतिहास व संस्कृती नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचा प्रशासनाचा संकल्प असून, अधिकाधिक नागरिक व पर्यटकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन वर्षा मीना यांनी केले आहे.

शहानूर हे गाव नरनाळ्याच्या पायथ्याशी वसलेले छोटेसे गाव आहे. या गावाच्या सभोवताली वनसमृद्ध व निसर्गसुंदर परिसर हा सातपुडा पर्वताच्या रांगांनी वेढलेला आहे. नरनाळा किल्ल्यावरुन निसर्गाकडे बघितले तर बाजूला सर्वत्र पर्वतांनी किल्ल्याला माळ घातल्याचा भास होतो. हा परिसर पर्यटकांचे व निसर्ग अभ्यासकांचे मनमोहून टाकणारा आहे.

नरनाळा किल्ला हा अकोट शहरापासून २४ किलोमीटर अंतरावर आहे. अकोला येथून अकोट मार्गे शहानूर - नरनाळा असे जाता येते. खाजगी वाहन किल्ल्यावर नेण्यास मनाई आहे. खासगी वाहन शहानुर गेट जवड ठेवण्यासाठी पार्कींगची व्यवस्था केलीली आहे. नरनाळा किल्ल्यावर जाण्यासाठी जिप्सीची व्यवस्था आहे. सोबत गाईडही मिळतो. राहण्यासाठी वन विभागाचे 'इको टुरिझम' कॉटेजेसही आहेत.

# “ईश्वर नामाशिवाय दुःखातून मुक्तीचा दुसरा मार्ग नाही” — वाणीभूषण दादा महाराज शेळके

**दैनिक युवक आधार**

**अंभोरा प्रतिनिधी/बाळासाहेब रकटाटे :** आष्टी तालुक्यातील अंभोरा येथील कै. बबन नारायण काकडे यांच्या दशक्रिया विधी निमित्त आयोजित धार्मिक कार्यक्रमात हरिभक्त परायण, सेवावाणीभूषण वाणीभूषण दादा महाराज शेळके यांचे हृदयस्पर्शी प्रवचन संपन्न झाले. उपस्थित भाविकांनी श्रद्धा व शांततेच्या वातावरणात या प्रवचनाचा लाभ घेतला.

यावेळी बोलताना दादा महाराज शेळके यांनी जीवनाच्या अनित्यतेवर मार्मिक भाष्य केले. त्यांनी सांगितले की, “माणसाचं जीवन क्षणभंगुर आहे. जन्माला आलेला प्रत्येक जीवाला एक दिवस या जगातून जावंच लागतं. म्हणून जिवंतपणीच सद्कर्म, सत्संग आणि ईश्वर नामाचे चिंतन केले पाहिजे.”

प्रवचनात त्यांनी संत तुकाराम महाराजांच्या अभंगातील ओळी—लवण



मिळविता जळे काय उरले ते निराळे तैसा समरस झालो तुज माझी हरपलो…”या अभंगाचा आधार घेत समर्पण, समरसता आणि नामस्मरणाचेt महत्त्व प्रभावीपणे सांगितले.

जसं मीठ पाण्यात मिसळलं की वेगळं अस्तित्व उरत नाही, तसंच भक्त जेव्हा परमेश्वरात समरस होतो, तेव्हा त्याचा अहंकार विरतो आणि त्याचं जीवन निर्मळ होतं—असा गाढ अर्थ त्यांनी भाविकांसमोर उलगडला.

महाराजांनी पुढे सांगितले की, दुःखातून मुक्ती हवी असेल तर ईश्वर नामाशिवाय दुसरा पर्याय नाही. जीवनात येणाऱ्या संकटांवर मात करण्यासाठी नामचिंतन, सदाचार आणि चांगली वाणी हीच खरी शिदोरी आहे.

अनेक उदाहरणांच्या माध्यमातून त्यांनी जीवनाचा खोल सिद्धांत मांडत उपस्थितांना अंतर्मुख केले.या प्रसंगी उपस्थितांनी काकडे परिवाराच्या दुःखात सहभागी होत श्रद्धांजली अर्पण केली, तसेच महाराजांच्या प्रवचनातून जीवन जगण्याचा योग्य मार्ग नव्याने समजल्याची भावना व्यक्त केली.

कार्यक्रम शांततामय वातावरणात, भक्तिभावाने पार पडला.

# बोंडीची पाखरंय : रानफळांच्या अस्तित्वाचा आणि निसर्गसंस्कृतीचा शोध

**लेखक : राजू झावरे**
**(ताजपूर अलिबाग)**

गावखेड्याच्या आसपास असलेल्या छोटेखानी जंगलांमधील रानफळांचे अस्तित्व आणि त्यांचे भवितव्य याविषयी काही मांडण्याच्या उद्देशाने या लेखनाची सुरुवात करीत आहे. नववर्षाच्या प्रारंभी अनेक जण संकल्प करतात; त्यातीलच एक संकल्प म्हणजे प्रामाणिक लिखाण. त्या संकल्पातून “बोंडीची पाखरंय” हा लेख जन्माला आला.

सकाळच्या कोवळ्या उन्हात पाखरईकडे वळताना, कालपर्यंत हिरवाईने लगडलेले बोंडीचे झाड अचानक निष्पर्ण झाल्याचे दृश्य मन हेलावून टाकणारे होते. वारा नव्हता, वादळ नव्हते; तरीही पानगळ झालेली. निसर्गातील हे बदल शांतपणे, पण ठळकपणे अनेक प्रश्न विचारायला लावतात. शिशिर ऋतू रंगांची उधळण करतो, पण त्याच वेळी येणारी पानगळ अंतर्मन हलवून टाकते.

“बोंडीची पाखरंय” म्हणजे केवळ एक जागा नव्हे, तर जंगलातून चाललेला एक जिवंत प्रवास आहे. लहान गाव, घराभोवती हिरवाई, उंच वृक्ष आणि खाली हिरवी बाग — सारेच चित्रवत. धुक्याची अलवार चादर पाखरईवर पसरलेली असायची. सकाळच्या वेळी लहान मुलांचा खेळ, पक्ष्यांचे स्वर आणि बोंडीच्या लालभडक फळांवर बसलेले पक्षी — या साऱ्यांतून निसर्गाशी नाते अधिक घट्ट होत गेले.

या पाखरईतून बोंडं, बोरं, करवंद, कोकम, काजू, चिंच, आवळा, आंबे अशा असंख्य रानफळांचा सहवास लाभला. त्या दिवसांचे आयुष्य साधे, पण भरगच्च आनंदी होते. आजच्या धावपळीच्या जीवनशैलीत संतुलित आहाराचा विचारही मागे पडत असताना, त्या रानमेव्याची चव आणि पोषणमूल्ये अधिकच मोलाची वाटतात.

बोंडी — म्हणजेच बिबवा — या रानफळाला शास्त्रीयदृष्ट्या Semecarpus anacardium असे म्हणतात. हिंदीत ‘भिलावा’ तर संस्कृत ग्रंथांत ‘भल्लातक’ असा उल्लेख आढळतो. तुरट-गोड चवीचे हे फळ सुकवून किंवा भाजून खाल्ले असता अतिशय चविष्ट लागते. परंतु आज या झाडांसोबत त्यांची ओळख, संस्कृती आणि सत्वही हरवत चालले आहे.

जंगलतोड, बेकायदा लाकूडतोड, वणवे आणि विकासाच्या नावाखाली



होणारा निसर्गविनाश यामुळे रानफळांचे अस्तित्व धोक्यात आले आहे. आदिवासींच्या निस्तार हक्कांपासून ते माणसाच्या निसर्गनिष्ठ जीवनशैलीपर्यंत अनेक प्रश्न अधिक गुंतागुंतीचे होत आहेत. आपणच आपल्या डोंगरदऱ्यांचे “घरचे मारेकरी” ठरत असल्याची जाणीव अस्वस्थ करणारी आहे.

पाखरई ही केवळ भौगोलिक जागा नसून, ती आत्मशांती देणारे निसर्गक्षेत्र आहे. ऋषीमुनींनी वनात साधना केली, विचारांची बीजे तिथेच रुजली. आजही अनेक विद्यार्थी या पाखरईत अभ्यास करून यशस्वी झाले आहेत. निसर्गातील शांततेतूनच विचारांची स्पष्टता आणि आत्मिक बळ मिळते.

कौलारू घरांवर सुकवलेल्या बोंडांच्या माळा, साठवलेल्या रानमेव्याच्या राशी आणि त्या आठवणी — या साऱ्यांतून माणसाचे निसर्गाशी असलेले नाते दिसते. ढबी बोंडींच्या भव्यतेसमोर उभे राहिले की माणसाचा अहंकार गळून पडतो आणि नम्रता शिकवली जाते.

भविष्यात रानफळांची ओळखच हरवणे ही गावखेड्यांची सर्वात मोठी हानी ठरेल. हायब्रीड फळांच्या झगमगाटात रानफळांचे वैचारिक, सांस्कृतिक आणि पोषणमूल्य हरवू नये, यासाठी जागरूक होण्याची गरज आहे. पुढील पिढीपर्यंत ही संस्कृती पोहोचवणे हे आपले सामूहिक कर्तव्य आहे.

“बोंडीची पाखरंय” हे लेखन केवळ आठवणींचे वर्णन नसून, निसर्गाशी पुन्हा जोडून घेण्याचे आवाहन आहे. देव नसला तरी निसर्गात दिव्यत्व आहे, भव्यतेत नम्रता आहे आणि अवाढव्यतेत आपले सूक्ष्म अस्तित्व दडलेले आहे — ही जाणीव जपण्यासाठीच हे लेखन.